रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक २५
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

दोन एसटी बसचा अपघात; १८ जण जखमी/२
वाशीत घरगुती वादातून मुलाकडून आईची हत्या/६
'रोहितला वर्ल्डकपपर्यंत निर्धास्तपणे खेळू द्या'/८

## 'संसदेत गृहमंत्री अमित शाह विरोधकांना देणार उत्तर'



**नवी दिल्ली** : संसदेच्या पावसाळी अधिवेशनात संसदेत चर्चा घडवून आणण्यास सरकार तयार असून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह स्वतः सभागृहात विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देतील, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून विरोधी पक्षांनी विद्यार्थी आंदोलनावरून गदारोळ सुरूच ठेवला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले, विद्यार्थी आंदोलन व त्याच्याशी संबंधित सर्व मुद्द्यांवर सरकार पूर्ण आणि सविस्तर चर्चेसाठी तयार आहे. विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्याचे उत्तर सरकार देईल. खुद्द गृहमंत्री अमित शाह यावर भाष्य करतील, पण गृहमंत्री जेव्हा उत्तर देण्यासाठी उभे राहतील, तेव्हा विरोधकांनी कोणताही अडथळा न आणता शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. चर्चा सुरू झाल्यानंतर सर्व बाजूंनी सखोल आणि सकारात्मक संवाद झाला पाहिजे.

# मुंबईत भव्य तिरंगा रॅली

## भारताला कुणी थांबवू शकत नाही : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

"काही परकीय शक्ती भारताच्या प्रगतीचा वेग पाहून घाबरल्या असून आपल्या अंतर्गत बाबींमध्ये लुडबूड करून देशाला रोखण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र हातात तिरंगा घेऊन बाहेर पडलेल्या या अथांग युवाशक्तीला रोखण्याची आणि भारताला महासत्ता होण्यापासून थांबवण्याची ताकद जगात कुणाच्यातही नाही", असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.१०) व्यक्त केला.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील वरळी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य तिरंगा रॅलीला संबोधित करताना मुख्यमंत्री बोलत होते. या रॅलीदरम्यान मुख्यमंत्र्यांनी हाती माईक घेत 'दिल दिया है जान भी देंगे, ऐ वतन तेरे लिये' हे देशभक्तीपर गीत गायल्याने उपस्थितांमध्ये उत्साह संचारला.




या रॅलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मंत्री मंगलप्रभाग लोढा, ॲड. आशिष शेलार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम, पद्मश्री भिकल्या धिंडा यांच्यासह अनेक प्रमुख नेते, पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. हातात डौलाने फडकणारा राष्ट्रध्वज आणि 'भारतमाता की जय', 'वंदे मातरम्'च्या गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

उपस्थितांना संबोधित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मला आज इथे दोन महासागर पाहायला मिळत आहेत. समोर एकीकडे अथांग हिंद महासागर आहे आणि दुसरीकडे माझ्यासमोर हा जनसागराचा 'तिरंगा महासागर'. ज्या तिरंग्याची आन-बान-शान राखण्यासाठी आमचे क्रांतिकारक फासावर चढले आणि सीमेवर जवानांनी आपले प्राण पणाला लावले, त्यांच्याच बलिदानामुळे १५ ऑगस्ट १९४७ रोजी हा राष्ट्रध्वज अभिमानाने फडकला. जोपर्यंत जगात चंद्र आणि सूर्य आहेत, तोपर्यंत हा तिरंगा कधीही खाली येणार नाही.

भारत जगात क्रमांक एकची महासत्ता बनेल अशी भीती काही आंतरराष्ट्रीय शक्तींना वाटत आहे. म्हणूनच ते भारताच्या अंतर्गत मामल्यांमध्ये अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र ही भारतमाता आता थांबणारी नाही. २०४७पर्यंत पंतप्रधान मोदी यांनी मांडलेली 'विकसित भारत'ची संकल्पना प्रत्यक्षात आलेली पाहायला मिळेल. ९ ऑगस्ट १९४२ची क्रांती ही ब्रिटिशांविरुद्धची 'भारत छोडो' चळवळ होती. आजची नवभारताची क्रांती ही 'करो या मरो' आणि 'विकसित भारत' घडवण्याची आहे. त्यामुळे आता देशाच्या विकासात खोडा घालणाऱ्या भारतविरोधी आणि परकीय शक्तींनाच 'भारत छोडो' म्हणायची वेळ आली आहे, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.



# पनवेल महापालिका एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची सभा

## दर्जेदार सेवा पुरवा -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने सोमवारी (दि. १०) मनपा मुख्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध आरोग्यसेवांचा आढावा घेतला. आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करताना दर्जात गुणात्मक आणि परिणामकारक सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

या सभेस महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड.प्रकाश बिनेदार, महापालिका सदस्य, उपायुक्त अभिषेक पराडकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, उपजिल्हा वैद्यकीय अधीक्षक शिवाजी पाटील हे प्रत्यक्ष उपस्थित होते, तर महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाचे अतिरिक्त संचालक डॉ. जगन्नाथ वीरकर, सहाय्यक संचालक तथा पालक अधिकारी डॉ. दीप्ती देशमुख तसेच इतर महापालिका सदस्य ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आभा कार्ड, आयुष्मान भारत कार्ड तसेच वयोवंदन योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा यासाठी महापालिका क्षेत्रातील आदिवासीवाड्या आणि झोपडपट्टी परिसरात विशेष शिबिरांचे आयोजन करण्याच्या सूचना दिल्या. आभा कार्ड व आयुष्मान भारत कार्ड काढताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी तहसील कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांसोबत लवकरच बैठक आयोजित करण्याबाबतही त्यांनी सूचित केले. त्याचप्रमाणे महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधांची माहिती देणारे फलक सर्वत्र लावावेत तसेच नागरिकांना माहितीपत्रकांचे वाटप करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत अधिकाधिक रुग्णालयांना या योजनांशी जोडून सर्वसामान्य नागरिकांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी खासगी रुग्णालयांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. (पान २ वर..)

### आरोग्यविषयक विविध उपक्रमांवर चर्चा

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा अधिक गतिमान व बळकट करणे तसेच आरोग्यविषयक उपक्रम अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने या सभेत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित महापालिका सदस्यांनी महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध आरोग्य सेवांमध्ये गुणात्मक वाढ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या.

## 'एफसीआरए विधेयकामुळे अनेकांना मिरची लागली'

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या प्रस्तावित फॉरेन कंट्रीब्युशन रेग्युलेशन ॲक्ट अर्थात 'एफसीआरए' दुरुस्ती विधेयकावरून होत असलेल्या आंतरराष्ट्रीय टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. "या विधेयकामुळे अमेरिकेतील काहींना मिरची का लागली आहे, यावरूनच भारताला असा कायदा आणण्याची नेमकी काय गरज आहे हे स्पष्ट होते," असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

नागपूर येथे माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशात एफसीआरए कायद्याचा गैरवापर करून काही संस्थांकडून परदेशातून प्रचंड निधी आणला जात आहे आणि या पैशांचा वापर भारतविरोधी कारवायांसाठी केला जात असल्याचे उघड झाले आहे. ही बाब देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. ज्या संस्था प्रामाणिकपणे समाजोपयोगी आणि चांगले काम करीत आहेत, त्यांच्यासाठी या विधेयकात कोणतीही अडचण किंवा त्रास नाही. ज्या संस्था नियमानुसार कामाचा आणि पैशांचा पारदर्शक हिशेब देतील, त्यांचे परवाने सुरक्षित राहणार आहेत.

अमेरिकेतून या कायद्यावर सातत्याने येत असलेल्या वक्तव्यांचा खरपूस समाचार घेताना मुख्यमंत्री म्हणाले, हा भारताचा संपूर्णपणे अंतर्गत विषय आहे. तरीही अमेरिकेतील काही घटकांना या दुरुस्ती विधेयकाची मिरची लागली आहे, यावरूनच या कायद्याची राष्ट्रीय गरज अधोरेखित होते. एफसीआरए विधेयक ख्रिश्चन संस्थांपुरते मर्यादित नसून परदेशातून निधी मिळवणाऱ्या प्रत्येक धर्माच्या आणि समाजाच्या संस्थेला लागू आहे. त्यामुळे याला धार्मिक रंग देणे चुकीचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू

**गडचिरोली** : धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रमशाळेत सर्पदंशाची धक्कादायक घटना घडली आहे. यामध्ये तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला असून अन्य तिघींवर उपचार सुरू आहेत.

नेहमीप्रमाणे रविवारी रात्री जेवण आटोपल्यानंतर आश्रमशाळेतील विद्यार्थिनी झोपल्या होत्या. मध्यरात्री दोन ते अडीचदरम्यान काही विद्यार्थिनींना सर्पदंश झाला. शाळा प्रशासनाने या विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल केले, मात्र सुश्मिता सरोजित मंडल (१४), दीपिका एतवा लकडा (१२), अनु गजुराम कोरेटी (८) यांचा मृत्यू झाला, तर दीपिका बिटलूरसाय मडावी (११), समृद्धी सुरेश नैताम (१४) व कविता राजकुमार किरंगा (१२) यांच्यावर गडचिरोली जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी समृद्धीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

## निवडक

### झारखंडमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन; पोलिसांची दडपशाही

**रांची** : झारखंडमध्ये जेपीएससी आणि इतर भरती परीक्षांतील अनियमितता आणि गैरप्रकारांविरोधात राजधानी रांचीमध्ये विद्यार्थ्यांनी सोमवारी (दि.१०) विधानसभेसमोर आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी लाठीचार्ज करून विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी यांच्यासह इतर नेत्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन केले. पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतले. त्यामुळे वातावरण चिघळले आहे.

### मुंबई दहशतवादी हल्ल्यातील टॉप कमांडरचा गूढ मृत्यू

**इस्लामाबाद** : मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या कटात सामील असलेल्या लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेच्या एका वरिष्ठ कमांडरचा पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये गूढ मृत्यू झाला आहे. कारी सईद अब्दुल अझीझ असे या मृत दहशतवाद्याचे नाव असून रविवारी इस्लामाबादमधील कुबा मशिदीच्या प्रवेशद्वाराबाहेर तो अचानक कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य सेवाभावी -ॲड. भगीरथ शिंदे

**मोखाडा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आदिवासी दिनाचे औचित्य साधून संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त 'जनसेवेचे अमृतपर्व : लोककल्याणाच्या अखंड सेवेचा प्रेरणादायी जीवनप्रवास' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा रविवारी उत्साहात झाला.

यावेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. अमृत महोत्सव वर्षानिमित्त आयोजित साप्ताहिक कार्यक्रमांच्या स्मरणिकेचे, प्राचार्य डॉ.ए.एन. चांदोरे, पी.पी. भालेकर, डी.ए. राजपकर, डॉ.एस.जी. मेंगाळ, प्रा.एस.के. डामसे लिखित विविध पुस्तकांचे आणि शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठीच्या महाविद्यालय माहिती पुस्तिकेचेही प्रकाशन करण्यात आले. याचबरोबर यशस्वी प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.



अध्यक्षस्थानावरून बोलताना व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करीत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

सत्कारमूर्ती लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षण, संस्कार व समाजसेवा यांचा संगम साधत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचा संदेश दिला.

माजी आमदार सुनील भुसारा, माजी जि.प. अध्यक्ष प्रकाश निकम, नगराध्यक्ष अमोल पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

### 'जनसेवेचे अमृतपर्व' ग्रंथाचे शानदार प्रकाशन

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. चांदोरे, उपप्राचार्य डॉ. मेंगाळ, हबीब शेख, शेळके, घुले आदींसह ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.व्ही.एम. मोरे व प्रा.आर.डी. घाटाळ यांनी केले. अमृत महोत्सवी ग्रंथासाठी संपादक म्हणून प्रा.एस.आर. व्हंडे यांनी परिश्रम घेतले. (पान २ वर..)

### डोळखांब विद्यालयास सदिच्छा भेट; प्रगतीचे कौतुक

मोखाडा कॉलेज येथून परतीच्या प्रवासाच्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डोळखांब विद्यालयाला सदिच्छा भेट दिली.



यावेळी त्यांनी ग्रामीण आदिवासी भागातील शाळेने केलेली प्रगती पाहून स्कूल कमिटी व सेवकवर्गाचे कौतुक केले. विद्यालयाच्या स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य तथा रायगड विभागीय समन्वय समिती सदस्य विकास चौधरी आणि प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांच्यासह शिक्षक गोखले, सापळे, मयूर पवार, प्रा.जगदीश विशे, गंगाड, पाडवी, वेदांत कोंगेरे, गणपत फर्डे, सुनील फर्डे उपस्थित होते.लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयाचे अद्ययावत कॅन्टीन, अटल टिंकरींग लॅब, प्रयोगशाळा, ग्रंथालय, बहुउद्देशीय सभागृह आणि एकंदर कामकाज पाहून कौतुक केले तसेच ११वी कॉमर्स शाखा सुरू करण्याविषयी सूचित करून संस्था पातळीवर सहकार्य करण्याचे अभिवचन दिले.

# रंगांच्या दुनियेत रमले बालमन!

## ▪ कळंबोलीत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप कळंबोली शहर मंडळाच्या वतीने तेथील विविध शाळांमध्ये चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणपूरक जीवनशैली आणि आपले सण, परंपरा या विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला रंगांची सुंदर साथ दिली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पर्धास्थळी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या स्पर्धेत कार्मेल स्कूल, सुधागड एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आणि सेंट जोसेफ स्कूलमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या चित्रांमधून पर्यावरण संवर्धन, भारतीय संस्कृती आणि सामाजिक मूल्यांचे प्रभावी दर्शन घडले.

स्पर्धेदरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमस्थळी भेट देत विद्यार्थ्यांच्या कलाकृतींची पाहणी केली. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याशी संवाद साधत त्यांच्या कल्पनाशक्तीचे आणि कलागुणांचे कौतुक केले. अशा स्पर्धांमुळे मुलांच्या सर्जनशीलतेला वाव मिळतो आणि त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, आयोजक तथा नगरसेवक अमर पाटील, नगरसेवक रवींद्र भगत, राजू शर्मा, नगरसेविका सरस्वती काथारा, दमयंती भोईर, मनाली ठाकूर, सरचिटणीस दिलीप बिष्ट, अमर ठाकूर, निलेश भोईर, युवा मोर्चाचे अध्यक्ष गौरव नाईक, उपाध्यक्ष संदीप भगत, समीर शेख यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि पालक उपस्थित होते.

## पनवेल मनपा प्रभाग समिती सभापतिपदांची निवडणूक | भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती सभापतिपदांच्या निवडणुकीसाठी हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या वतीने चारही प्रभाग समित्यांच्या सभापतिपदांसाठी अधिकृत उमेदवारांची घोषणा करीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

प्रभाग समिती 'अ'साठी रवींद्र भगत, 'ब'साठी मधू पाटील, 'क'साठी रवींद्र जोशी आणि 'ड'साठी अजय बहिरा यांनी आपले उमेदवारी अर्ज सादर केले. या अर्ज दाखल प्रक्रियेदरम्यान महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, शिवसेना नेते व नगरसेवक रामदास शेवाळे यांच्यासह अनेक नगरसेवक आणि नगरसेविका उपस्थित होते. पनवेल महापालिकेत भाजपचे स्पष्ट बहुमत असल्याने चारही प्रभाग समित्यांच्या सभापतिपदांवर भाजप उमेदवारांची निवड निश्चित मानली जात आहे.

या प्रभाग समित्यांमार्फत स्थानिक पातळीवरील विकासकामे, नागरिकांच्या समस्या आणि विविध नागरी सुविधांशी संबंधित निर्णय घेतले जातात. त्यामुळे या निवडणुकीकडे राजकीय व प्रशासकीय स्तरावर विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे. सभापतींची निवड झाल्यानंतर पनवेल शहरातील विकासकामांना अधिक गतिमान, पारदर्शक आणि प्रभावी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दिव्यांगांना रोजगार, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात प्राधान्य देण्यासाठी शासन कटिबद्ध -मुख्यमंत्री

नागपूर : प्रतिनिधी

दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी आवश्यक सहाय्यक साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच रोजगार, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात त्यांना प्राधान्य देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. दिव्यांगांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात येत आहे. सहाय्यक साधने उपलब्ध झाल्यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी भविष्यातही अशा शिबिरांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि नागपूर महानगरपालिका, भगवान महावीर विकलांग सहायता समिती जयपूर, जिल्हा परिषद नागपूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर जिल्ह्यातील अस्थिव्यंग व कर्णबधिर दिव्यांग व्यक्तींसाठी निःशुल्क जयपूर फूट साहित्य व सहाय्यक साधने मोजमाप व वाटप शिबिर कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, आमदार संजय भेंडे, आ. राजीव पोतदार, आ. कृपाल तुमाने, आमदार चरणसिंग ठाकूर, आ. मोहन मते, मनपा सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, सहसचिव (मुख्यमंत्री कार्यालय) आशा पठाण आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, दिव्यांग व्यक्तींच्या गरजेनुसार जयपूर फूट साहित्य तसेच विविध सहाय्यभूत साधनांचे मोजमाप करून त्यांचे निःशुल्क वितरण करण्यात आले. आवश्यक साधने मिळाल्यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन त्यांना अधिक स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या शिबिराला अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद मिळाला असल्याचे समाधान त्यांनी यावेळी व्यक्त केले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, मुख्यमंत्री कार्यालयातून दिव्यांगांसाठी अशा प्रकारचे शिबिर आयोजित करण्याची संकल्पना पुढे आली. भगवान महावीर विकलांग सहायता समितीने या आयोजनासाठी विशेष योगदान दिले आहे. ही समिती १९७५ पासून दिव्यांगांसाठी कार्यरत असून 'जयपूर फूट'च्या माध्यमातून दिव्यांगांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडविण्याचे काम करीत असल्याचे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडून दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. राज्य शासनाकडूनही दिव्यांगांना आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दिव्यांगांसाठी मानधन २५०० रुपये करण्यात आले असून विविध योजनांच्या माध्यमातूनही त्यांना मदत केली जात आहे. घरकुलासह अन्य शासकीय योजनांमध्ये दिव्यांगांना प्राधान्य कसे देता येईल, याबाबत शासन सकारात्मक प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. 'विकलांग'ऐवजी 'दिव्यांग' या सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांच्या क्षमतांना संधी देणे आवश्यक आहे. दिव्यांगता कमी करण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दिव्यांग व्यक्तींच्या UDID कार्डसाठी झोननिहाय कामकाज करण्यात यावे, अशी सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी शासन भविष्यातही सातत्याने काम करीत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# दोन एसटी बसचा अपघात; चालक-वाहकांसह १८ जखमी



महाड : प्रतिनिधी

महाड विन्हेरे मार्गावरील कुर्ला दिवेकर वाडी येथे दोन एसटी बस मध्ये समोरा समोर धडक झाली. या अपघातात दोन्ही एसटी बस मधून १४ प्रवाशी आणि दोन्ही एसटी बसचे चालक व वाहक असे एकूण १८ प्रवासी जखमी झाले आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार मुमूर्शी महाड एसटीबस आणि महाड ते मंडणगड अशी जाणारी एसटी बस या दोन बस मध्ये कुर्ला दिवेकर वाडी या गाव हद्दीत समोरासमोर धडक झाली. या आघातात दिलीप शंकर जुमनाके रा. मंडणगड (चालक ), जयशाली देविदास कांबले रा. मंडणगड, रुपेश दत्ताराम लुष्टे रा. दासगाव (चालक ),विठ्ठल यशवंत बरकडे रा.वाई, प्रगती सुदेश कासारे रा. कुर्ला महाड, शितल दामोदर वाघमारे रा. मुमूर्शी महाड, तारा गंगाराम पवार रा. मुमूर्शी, प्राची विशाल सकपाल रा. मुमूर्शी, प्रियांका गोपाल सकपाल रा. मुमूर्शी, सुरेश जनार्दन भोसले रा. मुमूर्शी,गोपाळ विष्णू सकपाळ रा. मुमूर्शी, कृष्णा शिवराम साखरे रा.रेवतले, राधिका कृष्णा साखरे रा. रेवतले, प्रतीक्षा अनिल खेडेकर रा. भोमजाई, विनोद हरिश्चंद्र माने, सुमन नथुराम मुकणे, अनवरी खलील निरबारकर, ऐश्वर्या विनोद भोसले असे एकूण १८ प्रवासी जखमी झाले.

सर्व जखमींवर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघाताची नोंद महाड तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास महाड तालुका पोलीस ठाणे मार्फत सुरू आहे. अपघातास कारणीभूत असलेले एसटी बस चालक रुपेश दत्ताराम लुष्टे यांच्यावर महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रीवर्धन रोडवर बेकायदेशीर खैराची वाहतूक

## बोलेरो पीकअपसह दोघे ताब्यात

श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त

दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धनगरमलई, श्रीवर्धन रोड येथे विभागीय गस्ती दरम्यान पोलिसांनी बेकायदेशीरपणे खैराच्या लाकडांची वाहतूक करणारा बोलेरो पिकअप पकडून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत दोन संशयितांना वाहनासह ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी वनविभागाच्या स्वाधीन करण्यात आले आहे.



दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मेंदाडकर हे पथकासह धनगरमलई परिसरात विभागीय गस्त घालत असताना, संशयित बोलेरो पिकअप (वाहन क्रमांकः MH ०५ EL ०९१६) आढळून आला. वाहनाची पहाणी केली असता, त्यात बेकायदेशीरपणे वाहून नेली जाणारी खैराच्या झाडाची ३० ते ३२ लाकडी ओंडके (अंदाजे ३ ते ४ फूट लांबीची) मिळून आले.यावेळी संशयित विठ्ठल भिकू हिलम रा. साई - काकल, ता. माणगाव,तुषार विनोद जाधव रा. खामगाव, ता. म्हसळा यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी सविस्तर पंचनामा करुन जप्त केलेला लाकडांचा साठा, बोलेरो पिकअप वाहन आणि दोन्ही संशयित इसमांना पुढील तपास व कायदेशीर कारवाईसाठी वन अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# खारघरच्या स्पामधील देहव्यापाराचा पर्दाफाश

पनवेल : वार्ताहर

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने खारघर येथील एका स्पा सेंटरवर धाड टाकून मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या देहव्यापाराचा पर्दाफाश केला. या कारवाईत तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून स्पाच्या व्यवस्थापकासह एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार खारघर सेक्टर-७ येथील 'ग्रेसफुल टच सलून अँड स्पा' येथे बनावट ग्राहक पाठवून खातरजमा करुनपोलिसांनी कारवाई केली.छाप्यात स्पामध्ये देहव्यापारासाठी ठेवण्यात आलेल्या तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली.या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.ही कारवाई सहायक आयुक्त शैलेशकुमार अंचलवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक गजानन कदम, सहाय्यक निरीक्षकयोगेश देशमुख, उपनिरीक्षक सरिता गुडे, हवालदार पाटील,म्हात्रे,अडकमोल, हांडे शिपाई ठाकूर,चव्हाण, पारसुर, आव्हाड, कोलते यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# रायगडच्या विकासकामांना गती देत नागरिकांना केंद्रबिंदू मानून काम करा

## मंत्री भरत गोगावले यांचे आढावा बैठकीत निर्देश

मुंबई : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील सर्व विभागांनी सामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून विकासकामे व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. नागरिकांना शासकीय योजनांचा व सुविधांचा वेळेत लाभ मिळेल, यासाठी विभागांनी समन्वयाने व गतिमान पद्धतीने काम करावे, असे निर्देश रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिले. रोहयो मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्ह्यातील विभागनिहाय सद्य:स्थिती (२०२६-२७) बाबत आढावा बैठक मंत्रालयातील त्यांच्या दालनात झाली. यावेळी जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामांचा, प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला.



बैठकीत रायगड जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय व आरोग्य रुग्णालयातील सोयी-सुविधा, आरोग्य सेवा तसेच आवश्यक पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या संदर्भातील प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याबाबत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याशी मंत्री गोगावले यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून प्रस्तावांवर तात्काळ कार्यवाही करण्याची विनंती केली.


रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती मदत व कार्यवाही करावी, अशा सूचनाही मंत्री गोगावले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पात्र लाभार्थी शेतकरी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, यासाठी विभागांनी आवश्यक समन्वय साधावा, असे त्यांनी सांगितले.


जिल्ह्याच्या विकासकामांसाठी प्राप्त झालेल्या निधीचा वेळेत व प्रभावीपणे वापर करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. मंजूर निधीचा योग्य विनियोग करून विकासकामांना गती देण्याच्या सूचना मंत्री गोगावले यांनी दिल्या. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# पोलादपूर गोपाळवाडीतील झुलत्या पुलाचा प्रस्ताव विचाराधीन

पोलादपूर : प्रतिनिधी

गोपाळवाडी ते घागरकोंडपर्यंत ग्रामस्थांना पायी चालत जाण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने उभारलेला झुलता पूल वर्षाकालीन पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला, पण २०२१च्या अतिवृष्टीमध्ये वाहून गेल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांनी केलेल्या घोषणा अंतर्गत वादामुळे हवेत विरल्या. आता महायुती सरकारकडून हा झुलता पूल उभारण्यासाठी हालचाली होणार आहेत.





उमरठ येथे कुलाबा बोर्डाचे तत्कालीन अध्यक्ष लिमये यांनी नरवीर तानाजी मालुसरे आणि शेलारमामा यांची संयुक्त समाधी उभारली. त्याच काळात वाकण गोपाळवाडी ते घागरकोंडपर्यंत पायी चालत जाण्यासाठी लोहरज्जूचा झुलता पूल बांधून घेतल्याची माहिती महाड लाडवली येथील तत्कालीन बांधकाम व्यावसायिक मनोहर शिंदे यांनी दिली.

२०१८ मध्ये झुलत्या पुलाच्या फुटबोर्डवरील वायररोप म्हणजे लोहरज्जू निघाल्याने दुरुस्तीची आवश्यकता व्यक्त झाली आणि त्यानंतर रायगड जिल्हा परिषदेने लाखो रुपये खर्चून हे काम पूर्ण केले. यामुळे हा झुलता पूल सक्षमपणे घागरकोंडपर्यंत ग्रामस्थांना चालत जाण्यासाठी उपयुक्त ठरत असताना याठिकाणी उभारण्यात आलेल्या स्मशानभूमीमुळे पर्यटनाचा हिरमोड झाला. मात्र, अशातही या झुलत्या पुलाच्या रस्त्याला जोडलेल्या वाकण गोपाळवाडीत बियर शॉपी सुरू झाल्याने या स्मशानभूमीच्या ओट्यावर बसून बियरच्या बाटल्या रिकाम्या करून ठेवण्याचे थ्रीलही पर्यटक अनुभवू लागले होते.

२०२१च्या अतिवृष्टीमध्ये हा झुलता पूल वाहून गेल्यानंतर महाविकास राज्य आघाडी सरकारच्या मंत्र्यांनी केलेल्या घोषणा अंतर्गत वादामुळे हवेत विरल्या. त्यावेळी पर्यटन राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी आणलेला १० कोटींचा निधी अंतर्गत वादामुळे परत गेला.

रायगड जिल्हा परिषदेकडे पुन्हा झुलता पूल उभारण्यासाठी आर्थिक सक्षमता नसल्याने राज्यातील महायुती सरकारकडे हा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे रायगड जिल्हा परिषदेचे सभापती चंद्रकांत कळंबे यांनी सांगितले.

लवकरच झुलता पूल उभारण्यासाठी मंजुरी व निधीची उपलब्धता होऊन हे विकास काम आधुनिक पद्धतीने साकारण्यात येईल, अशी माहिती यावेळी सभापती चंद्रकांत कळंबे यांनी दिली. तेव्हा नागरिकांना दळणवळाची सुविधा आणि पर्यटकांना आकर्षण केंद्र मिळणार आहे.

पान १ वरुन

# पनवेल महापालिका एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची सभा

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाचे अतिरिक्त संचालक डॉ. जगन्नाथ वीरकर यांनी पनवेल महापालिकेने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आरोग्य क्षेत्रातील आदर्श निर्माण करण्याच्या दृष्टीने 'पनवेल महानगरपालिका मॉडेल' म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगितले. महापालिका कार्यक्षेत्रातील लोकसंख्येचा विचार करता नवीन आरोग्य केंद्र सुरू करणे गरजेचे असून त्या दृष्टीने राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या वतीनेही प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन आरोग्य केंद्रांसाठी विविध माध्यमांतून विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी माहिती दिली.

मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीच्या उद्देशाची माहिती उपस्थितांना दिली तसेच महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध आरोग्य सेवा व सुविधांची माहिती दिली. आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये नागरिकांचा आणि समुदायाचा सहभाग अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीस महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीच्या सचिव क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड यांनी मानले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य सेवाभावी -ॲड. भगीरथ शिंदे

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत वर्षानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाद्वारे परिसरात वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक उपस्थित होते. या उपक्रमाचे नियोजन एनएसएस विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.आर. व्हंडे व प्रा.टी.एम. पराडके यांनी केले होते.

# रोह्यात लिंगायत समाजाला दफनभूमीची प्रतीक्षा

रोहा : प्रतिनिधी

रोहा,भुवनेश्वर येथे लिंगायत समाजासाठी दफनभूमीच नाही.त्यामुळे मरणानंतर ही जागा नाहीच अशी म्हणण्याची वेळ लिंगायत समाजावर आली आहे.दुसरीकडे सातत्याने मागणी व पाठपुरावा दफनभुमी साठी होत असताना शासन व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

रोहा शहर व तालुक्यातील आकाराने मोठी व प्रतिष्ठित असलेल्या वरसे ग्रामपंचायत हद्दीतील भुवनेश्वर येथे लिंगायतसह जंगम, वाणी, गुरव व अन्य पोटजातीचे लोक मोठ्या प्रमाणात राहातात.या समाजात एखाद्या व्यक्तीचे मृत्यु झाल्यास त्याचे दफन केले जाते.परंतु रोहा शहर व भुवनेश्वर येथे दफनभुमी नसल्यामुळे या समाजातील नागरीकांची मोठी अडचण होते. एकतर दफन करण्यासाठी आपल्या गावी घेऊन जावे लागत आहे.अथवा धर्माच्या विरोधात जात अंत्यविधी करावे लागत आहे.

गाव तिथे स्मशान भुमी हे शासनाचे धोरण आहे.रोहा शहर व भुवनेश्वर येथे लिंगायत समाजाला दफन भुमी नसल्याने या संबधीत शासनाकडे दफन भुमी साठी तीन वर्षा पुर्वी मागणी केली होती.भुवनेश्वर दफन भुमी साठी शासनाने जागा ही दाखवली परंतु पुढे दफन भुमीचा प्रश्न अंधातरीच राहीला.

दुसरीकडे रोहा शहरासाठी स्मशानभुमी संदर्भात सुरु झालेली प्रक्रीयासुध्दा थांबली.या प्रश्नाबाबत खा.सुनील तटकरे यांच्या आढावा बैठकीत दोनदा प्रश्न समोर आला होता.त्यांनी या विषयाकडे लक्ष देण्याच्या सुचेना ही दिल्या होत्या.परंतु या प्रश्ना संदर्भात सकारात्मक कोणते ही तरी पाऊल उचललेले दिसुन येत नाही.

रोहा शहरात अथवा भुवनेश्वर येथे दफनभुमी नसल्याने एखाद्या कुटुंबात व्यक्ती मृत झाल्या नंतर अंत्यसंस्कार विधी दुःखाच्यावेळी अडचणीची ठरत आहे.शहरातील प्रतिष्ठित कुटुंबाला दफन करण्यासाठी जागा न मिळाल्याने मुळ गावी लातुर येथे घेऊन जावे लागले.आपले सर्व आयुष्य रोह्यात घालवले परंतु मृत्यु नंतर ही जागा नसल्याचे दिसून आले आहे.

# 'मी GEN X... एका Gen Zचा बाबा' पुस्तकाचे प्रकाशन



कामोठे : रामप्रहर वृत्त

आजच्या Gen Z पिढीला समजून घेणे, तिच्याशी संवाद साधणे आणि पालक व मुलांमधील वाढती दरी कमी करणे हा सकारात्मक संदेश देणाऱ्या डॉ. गोरखनाथ पोळ लिखित 'मी GEN X... एका Gen Zचा बाबा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात झाला.

बदलत्या काळात दोन पिढ्यांमधील विचार, जीवनशैली, तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षण, करिअर, नातेसंबंध, संस्कार आणि संवाद यामध्ये मोठे बदल झाले आहेत. या बदलांकडे संघर्ष म्हणून न पाहता Gen X आणि Gen Z या दोन पिढ्यांमध्ये संवादाचा पूल निर्माण व्हावा, या उद्देशाने डॉ. गोरखनाथ पोळ यांनी हे पुस्तक लिहिले आहे. पुस्तकामध्ये लेखकाने शिक्षण क्षेत्रातील आपल्या दीर्घ अनुभवासोबतच एका वडिलांच्या भूमिकेतून Gen Z पिढीकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

आजच्या तरुण पिढीची स्वप्ने, त्यांची स्वतंत्र विचारसरणी, तंत्रज्ञानाशी असलेले नाते, करिअरकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन तसेच पालकांच्या अपेक्षा आणि मुलांच्या भावना यांचा सहज व सकारात्मक पद्धतीने वेध घेण्यात आला आहे.

पनवेलचे महापौर नितीन पाटील यांनी या पुस्तकाला शुभेच्छा दिल्या. या प्रकाशन सोहळ्यास सुषमा पाटील विद्यालयाचे संस्थापक-चेअरमन दिलीप पाटील, कामोठे येथील नगरसेवक विकास घरत, डॉ. भगत, डॉ. पवन अग्रवाल, डॉ. मंदार पनवेलकर, डॉ. अनंत धरणेकर, श्रावण घरत, सुविद्या विद्यालयाचे चेअरमन, जाधव, केतकी प्रकाशनचे संस्थापक चंद्रकांत जाधव, बाळासाहेब फडतरे, स्मिता पनवेलकर, भाई पाटील, विजय पाटील, राहुल राणे, प्रकाश वाळुंज, संजय किसवे, अर्जुन गोवारी, दिलीप गुप्ता, प्रा. दिनेश गुप्ता , विजय सावंत गोरख जेधे, फडतरे सर, सुरेश खरात यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# पनवेलमध्ये ‘युवोत्कर्ष द यूथ कॉन्क्लेव्ह’ उत्साहात

## युवाशक्तीला नवी दिशा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या युवा शक्तीला प्रेरणा, दिशा आणि नवी ऊर्जा देणारा ‘युवोत्कर्ष द यूथ कॉन्क्लेव्ह’ हा विशेष कार्यक्रम रविवारी पनवेल शहरातील विरूपाक्ष हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. युथ फॉर भारत, पनवेल यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने युवक-युवतींची उपस्थिती लाभली. ‘यंग माइंड्स ऑफ पनवेल’ या विषयावरील प्रेरणादायी पॅनल डिस्कशन हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांनी आपल्या अनुभवातून यशाचा प्रवास, नेतृत्व कौशल्य, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रनिर्माणातील युवकांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. ज्येष्ठ पत्रकार आणि न्यूज अँकर दीपक पालसुळे यांच्या प्रभावी संयोजनातून रंगलेल्या या चर्चासत्रात सीए हेमांशू पांड्या, रिद्धी म्हात्रे, जयदीप काणे, सर्वेश अभ्यंकर आणि मिथिला माळी यांनी सहभाग घेत उपस्थित तरुणांशी मुक्त संवाद साधला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या ‘इग्नाईट टॉक’मधूनही युवकांना नव्या संधी, आव्हाने आणि भविष्यातील दिशा याविषयी प्रेरणादायी विचार ऐकायला मिळाले, तर पनवेलच्या उत्साही तरुणांनी सादर केलेल्या विशेष ‘भजन जॅमिंग’ने कार्यक्रमाला सांस्कृतिक आणि उत्साहवर्धक रंगत प्राप्त झाली.

युवकांच्या कल्पना, नेतृत्व क्षमता आणि सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने पनवेलमधील युवा शक्तीला एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. नव्या विचारांची देवाणघेवाण, प्रेरणादायी संवाद आणि सकारात्मक ऊर्जेने भरलेला ‘युवोत्कर्ष द यूथ कॉन्क्लेव्ह’ हा कार्यक्रम उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला. युवकांच्या सहभागातून सक्षम समाज व सशक्त राष्ट्र उभारण्याचा संदेश देणाऱ्या कार्यक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत असून पनवेलच्या युवा शक्तीसाठी ‘युवोत्कर्ष’ एक प्रेरणादायी आणि दिशादर्शक उपक्रम ठरला आहे.

# ‘सीकेटी’त अमली पदार्थविरोधी जनजागृती आणि मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी ज्युनिअर) उच्च माध्यमिक विद्यालयात सहशालेय समितीतर्फे ८ ऑगस्टला "ड्रग्ज डी-ॲडिक्शन कनेक्ट विथ कॅम्पस २०२६" या अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या घातक परिणामांची माहिती तसेच विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या गैरवापराबद्दल जनजागृती करणे, विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्त व निरोगी जीवनशैलीबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या जनजागृती कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक घागरे आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल मनोज जाधव उपस्थित होते. नवी मुंबई पोलीस विभागाच्या वतीने युवकांमध्ये वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या सेवनाबाबत जनजागृती करण्यासाठी अमली पदार्थविरोधी अभियान राबविण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक घागरे यांनी आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम स्पष्टपणे समजावून सांगितले तसेच अमली पदार्थांशी संबंधित कायदेशीर तरतुदी, व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व आणि सुरक्षित तसेच निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले. सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयातील १५३ विद्यार्थी कार्यक्रमास हजर होते.

सदर कार्यक्रमासाठी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, कला आणि वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सहशालेय समितीतील सहशिक्षिका शितल पाटील, ज्योती वाघ, हर्षदा लोखंडे तसेच सहशिक्षक अरुण पाटील, विवेक पाटील यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

## निवडक

### विक्रेत्यावर गुन्हा दाखल

**पनवेल** : येथील शहर पोलिसांनी परिसरात विनापरवाना गॅस सिलिंडरच्या साहाय्याने इंडली-डोसा विक्री करणाऱ्या एका विक्रेत्यावर कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे. बाबूल साहू (२८) विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करंजाडे परिसरात आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी गॅस सिलिंडरच्या साहाय्याने इडली-डोसा विक्री करताना आढळला. यामुळे मानवी जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

### ट्रेलर चालकाविरोधात कारवाई

**पनवेल** : सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने ट्रेलर उभा केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी ट्रेलर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्रदीप सहानी (४८)विरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल येथील जेएनपीटी महामार्गावरील समोरील रस्त्यावर आरोपीने मॉन्स्टर ट्रेलर सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक स्थितीत उभा करून ठेवला होता. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित बिरादार करीत आहेत.

### सायकल चोरीप्रकरणी गुन्हा

**पनवेल** : पनवेल शहरातील एका गृहनिर्माण सोसायटीच्या पार्किंगमधून सायकल चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल येथील सुशील जानकी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी येथील पार्किंगमध्ये उभी असलेली निळ्या व नारिंगी रंगाची सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. चोरीस गेलेल्या सायकलीची किंमत ७,१०० रुपये असून फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गाडीची काच फोडून लॅपटॉपची चोरी

**नवीन पनवेल** : गाडीची काच फोडून दोन लॅपटॉप आणि रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात १० ऑगस्ट रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बलविंदर सिंग बहेल मुंबई येथे राहत असून ९ ऑगस्टला त्यांनी त्यांची कार पोलीस मुख्यालयाच्या बाजूच्या रस्त्याच्या कडेला रोडपाली, कळंबोली येथे पार्क केली होती. यावेळी त्यांच्या गाडीची काच फोडून चोराने ८० हजार रुपये किमतीचे दोन लॅपटॉप, २५ हजार रुपये, डेबिट कार्ड आणि सिल्वरचे कॉइन चोरून नेले.

### मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

पनवेल : पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटली नसून याबाबत माहिती असल्यास पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. एका अनोळखी इसमाचा पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. मृताचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून रंग गोरा, उंची सुमारे ५ फूट ४ इंच आहे. काळ्या रंगाची दाढी-मिशी आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय अस्प्तराव करीत आहेत.

### वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल** : अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत ४२ वर्षीय संतोष प्रणव सरकार यांचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी ९ ऑगस्ट रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रात्री बाराच्या सुमारास पनवेल जेएनपीटी रोडवर जेडब्ल्यू आर कंपनी कंटेनर यार्डसमोर संतोष सरकार यांना अज्ञात वाहनचालकाने धडक दिली. अपघातात संतोष सरकार गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला.

### परदेशात नोकरीच्या बहाण्याने फसवणूक

**नवीन पनवेल** : परदेशात नोकरीचे आमिष दाखवून २५ जणांची १७ लाख ७३ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अब्दुल हमीद मोहम्मद युसुफ शेख, फर्मान शेख आणि ओमप्रकाश यांच्या विरोधात ९ ऑगस्ट रोजी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दुल मोहम्मद फैजुल हक आणि इतर २४ जणांना आरोपींनी ट्रॅव्हल लाईन गो नावाची बोगस कंपनी स्थापन करून त्याद्वारे परदेशात नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पैसे घेतले. पैसे घेतल्यानंतर त्यांना परदेशात नोकरीस न पाठवता फसवणूक केली.

# विनायक कोळी यांचा सामाजिक कार्याबद्दल राज्यस्तरीय सन्मान

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत समाजाच्या विविध घटकांसाठी सातत्याने योगदान देणारे विनायक लक्ष्मण कोळी (नाखवा) यांना सामाजिक सेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रहार यूथ ऑर्गनायझेशन, सेवाअर्थ सोशल फाउंडेशन आणि राष्ट्रवादी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ‘आदर्श महाराष्ट्र गौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

पुणे येथे आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांना सन्मानपत्र देऊन त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विनायक कोळी यांचे अभिनंदन केले. यावेळी विश्वनाथ कोळी, ॲड. राहुल घरत, भगवान कोळी, बाळकृष्ण कोळी आदी उपस्थित होते. विनायक कोळी यांनी विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला असून याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे समाजात आदर्श निर्माण झाला असून कार्याचे कौतुक म्हणून सन्मान देण्यात आल्याचे सन्मानपत्रात नमूद करण्यात आले आहे.

# सीकेटी विद्यालयात हिमोग्लोबिन, नेत्रतपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सीकेटी विद्यालय, इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागात विद्यार्थ्यांसाठी विशेष हिमोग्लोबिन आणि नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या वतीने आयोजित या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून केली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, रोटरी क्लबच्या अध्यक्षा डॉ. जयश्री पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी, डॉक्टर आणि मान्यवर उपस्थित होते. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तसेच डोळ्यांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक आवश्यक मार्गदर्शनदेखील करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांनी चांगल्या विचारांचे अनुकरण करीत आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन केले. वाढत्या स्क्रीन टाइममुळे डोळ्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांकडे लक्ष वेधत शारीरिक आणि बौद्धिक विकासासाठी शरीरातील हिमोग्लोबिनची योग्य पातळी महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. रोटरी क्लबच्या अध्यक्षा डॉ. जयश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबत उत्तम आरोग्यही तितकेच आवश्यक असल्याचे नमूद केले.

दरम्यान, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होत असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले. रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या सदर उपक्रमाचे शाळेच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या निरोगी आणि उज्ज्वल भविष्यासाठी अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन प्रेरणादायी ठरत असल्याची भावना समस्त पालकांनी यावेळी व्यक्त केली.

# गव्हाण विद्यालयात वाढदिवसानिमित्त पुस्तक भेटीचा अभिनव उपक्रम

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षांच्या तयारीवर विशेष भर देणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये एका अभिनव आणि प्रेरणादायी नवोपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. विद्यालयात कार्यरत असलेल्या सेवकांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयास स्पर्धा परीक्षांची पुस्तके भेट देण्याचा संकल्प करण्यात आला असून, या संकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी विद्यालयाच्या उपशिक्षिका तथा मराठी विषयतज्ज्ञ उज्ज्वला म्हात्रे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त केली.



सोमवारी (दि. १०) या उपक्रमाचा शुभारंभ करताना उज्ज्वला म्हात्रे यांनी इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षा आणि इयत्ता आठवी एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या पुस्तकांचा संच विद्यालयास भेट दिला. हा पुस्तक संच त्यांनी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केला. विद्यालयाच्या वतीने उज्ज्वला म्हात्रे यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले तसेच त्यांच्या या शैक्षणिक योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी उपमुख्याध्यापक विलासराव लिंबे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संपदा म्हात्रे, इयत्ता आठवी एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षा विभागप्रमुख वृषाली म्हात्रे, तसेच शितलकुमार म्हात्रे, विशांत ठाकूर, दर्शना माळी यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

## कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल** : कारने दुचाकीला समोरून धडक दिल्याने झालेल्या अपघातात प्रशांत काशिनाथ तळेकर (३६) यांचा मृत्यू झाला, तर दोघे जण जखमी झाले. या अपघातप्रकरणी कारचालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात ९ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशांत तळेकर, यशोदा तळेकर व आरुष तळेकर हे दुचाकीवरून उसाटने ते पनवेलच्या दिशेने जात होते. सातबारा हॉटेल नागझरीच्या पुढे आल्यानंतर पांढऱ्या रंगाच्या कारचालकाने कोणताही सिग्नल न देता यू टर्न घेतला आणि दुचाकीला समोरून धडक दिली. या अपघातात प्रशांत तळेकर यांचा मृत्यू झाला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना सीपीआरचे प्रात्यक्षिक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ३१ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अपोलो हॉस्पिटल खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी सीपीआर प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षण सत्राचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना हृदयविकाराचा झटका, अचानक बेशुद्ध पडणे किंवा श्वसनक्रिया बंद होणे यांसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तातडीने करता येणाऱ्या प्राथमिक जीवनरक्षक उपायांची माहिती व प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे हा होता.



अपोलो हॉस्पिटलमधील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांनी सीपीआरचे आणि सीपीआर करण्याची योग्य पद्धत, छातीवर दाब देण्याचे तंत्र, श्वसनासंबंधी प्राथमिक मदत तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला वैद्यकीय मदत मिळेपर्यंत कोणती काळजी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे सीपीआर करण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रत्यक्ष सीपीआर तंत्राचा सराव केला.

दरम्यान, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून आयोजित उपक्रमाचे विद्यार्थ्यांनी स्वागत केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक, प्राध्यापकवर्ग, स्वयंसेवक विद्यार्थी तसेच अपोलो हॉस्पिटल खारघर येथील तज्ज्ञांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# अपघातप्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा

**पनवेल** : येथील परिसरात भरधाव व निष्काळजीपणे ट्रेलर चालवत चारचाकीला धडक दिल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रेलर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कृष्णमूर्ती पोटीरस्वामी (४५) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार श्री मातोश्री ट्रान्सपोर्ट प्रा. लि. कंपनीच्या ट्रेलरवरील चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जेडब्ल्यूआर कंपनीसमोर पनवेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर हा अपघात घडला. ट्रेलर चालकाने फिर्यादीच्या वाहनाला धडक दिली. या धडकेत वाहनाचे नुकसान झाले. अपघातानंतर ट्रेलरचालकाने पळ काढला.

# ‘रोटरी’तर्फे क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांना व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल आणि पनवेल परिसरातील सर्व रोटरी क्लब्सच्या संयुक्त विद्यमाने 'व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड' (व्यावसायिक उत्कृष्ट पुरस्कार) सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचा हा प्रतिष्ठित पुरस्कार भारताचा कर्णधार 'हिटमॅन' रोहित शर्मा, शार्दुल ठाकूर आणि सिद्धेश लाड यांचे क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांना प्रदान करण्यात येणार आहे. भारतीय क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट प्रशिक्षणासाठी दिला जाणारा प्रतिष्ठित द्रोणाचार्य पुरस्कार विजेते म्हणून दिनेश लाड यांचा भारत सरकारने गौरव केला आहे.

आपल्या व्यवसायात उच्च नैतिक मूल्ये जपणे, उत्कृष्ट कामगिरी करणे आणि दैनंदिन कामाच्या पलीकडे जाऊन समाजासाठी प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी रोटरी क्लबतर्फे दरवर्षी हा 'व्होकेशनल अवॉर्ड' दिला जातो. कार्यक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष प्रसाद दीक्षित आणि सचिव राजेंद्र कदम यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले असून प्रमुख पाहुणे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन नितीन ढमाले उपस्थित राहणार आहेत.

पनवेल परिसरातील इतर सर्व रोटरी क्लब्स या सोहळ्याचे सहआयोजक आहेत. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, जुने पनवेल येथे बुधवारी (दि. १२) सायंकाळी ७ वाजता हा कार्यक्रम होणार असून या सोहळ्यास सर्व नागरिकांनी व रोटरी सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# भारताचा पलटवार

भारत आणि चीन सध्या उभयतांतील तणाव कमी करून संवाद वाढवण्याच्या प्रयत्नात आहेत. अर्थात असे असले तरी सीमा प्रश्नासंदर्भात कोणतीही संदिग्धता राखण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. चीनशी संवाद सुरू ठेवतानाच भारताने आपल्या सीमांबाबत कोणतीही तडजोड होणार नाही हा संदेश स्पष्टपणे आणि सातत्याने दिलाच पाहिजे.

**भारत कायमच हे स्पष्टपणे सांगत आला आहे की अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग आहे. तिथल्या ठिकाणांना काल्पनिक नावे देण्याच्या चीनच्या कुरापतींनी वास्तव बदलणार नाही. परंतु तरीही चीनने एप्रिल २०२६ मध्ये अरुणाचल प्रदेशातील २३ ठिकाणांना स्वतःच्या पद्धतीने नावे देत आपला या प्रांतावरील तथाकथित दावा पुढे रेटण्याचा प्रयत्न केला. भारताने तेव्हाच ही कृती फेटाळून लावली होती. आता मोदी सरकारने चीनच्या 'नकाशा-युद्धा'ला स्वतःच्या अधिकृत नकाशातून ठोस प्रत्युत्तर दिले आहे. शांतता हवी असेल तर ती सामर्थ्य आणि स्पष्टतेच्या आधारानेच टिकवता येते. ठिकाणांच्या नामांतरातून आगळीक करण्याची चीनची पद्धत नवीन नाही. चीन अरुणाचल प्रदेशला झांगनान म्हणून संबोधतो. यापूर्वीही काही वेळा चीनने अरुणाचल प्रदेशातील निरनिराळ्या ठिकाणांचे, शहरे, नद्या आणि भौगोलिक वैशिष्ट्यांचे नामांतर करण्याचा प्रयत्न केला आहे. यावर्षीची २३ ठिकाणांची नावांची यादी त्याच मालिकेतील पुढचे पाऊल होते. मात्र एखाद्या भूभागाचे निव्वळ नाव बदलल्याने त्याची मालकी बदलत नाही. एखाद्या प्रदेशावर प्रशासन, कायदेशीर अधिकार आणि प्रत्यक्ष सार्वभौमत्व नसताना केवळ चीनने नकाशावर किंवा सरकारी अधिसूचनेत त्याचे नाव बदलण्याने त्या देशाचा दावा सिद्ध कसा होऊ शकेल? भारतीय केंद्रीय गृह मंत्रालयाने आता अरुणाचल प्रदेश सरकारशी सल्लामसलत करून २७ ठिकाणांची नावे सर्व्हे ऑफ इंडिया म्हणजे भारतीय सर्वेक्षण विभागाकडून प्रकाशित अधिकृत नकाशावर नोंदवली आहेत. ही केवळ कागदावरील औपचारिकता नाही. भूगोल, प्रशासन, महसूल, जनगणना, पायाभूत सुविधा आणि सीमारस्त्यांच्या नियोजनासाठी अधिकृत नकाशावरील नोंद महत्त्वाची असते. या ठिकाणांमध्ये लोंगजूचाही समावेश आहे. हे ठिकाण प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या जवळ आहे. अधिसूचित करण्यात आलेल्या ठिकाणांमध्ये जोजि ला, रिझा ला आणि पुकुर ला यांसारख्या उंचावरील खिंडींचा तसेच शेर-ए-थापा या स्मृतिस्थळाचाही समावेश आहे. भारताच्या अधिकृत नकाशावरील या स्पष्ट नोंदी म्हणजे भारताचा दावा आणि प्रशासकीय दस्तऐवज अधिक स्पष्ट करणे आहे. चीनच्या अशा प्रत्येक चिथावणीला भावनिक किंवा आक्रमक भाषेत उत्तर देण्याऐवजी मोदी सरकारने राजनैतिक निषेधासोबत प्रशासकीय आणि भौगोलिक पातळीवर ठोस पावले उचलली आहेत. अरुणाचल प्रदेशातील २७ ठिकाणांची अधिकृत नकाशावरील नोंद ही म्हणूनच 'नावाला नाव' देण्याची साधी प्रतिक्रिया नाही. ती भारताच्या सार्वभौमत्वाची प्रशासकीय आणि रणनीतिक पुनर्मांडणी आहे. चीनने काल्पनिक नावे ठेवून वास्तव बदलण्याची कुरापत केली. परंतु भारताने अधिकृत नकाशावर आपले वास्तव अधिक ठळक केले. सीमा केवळ युद्धातून सुरक्षित होत नाहीत. तर त्या नकाशा, प्रशासन, पायाभूत सुविधा आणि देशाच्या ठाम इच्छाशक्तीद्वारेही सुरक्षित केल्या जातात. मोदी सरकारचा हा निर्णय त्या व्यापक राष्ट्रीय निर्धाराचे प्रतीक आहे. अरुणाचल प्रदेशातील २७ ठिकाणे आणि भौगोलिक वैशिष्ट्यांना भारताने अधिकृत नकाशावर प्रमाणित नावे देण्याचा घेतलेला निर्णय हा चीनला दिलेला केवळ प्रतिकात्मक धक्का नाही तर ती भारताच्या सार्वभौम अधिकाराची सुस्पष्ट घोषणा आहे.**

# चला माती परीक्षण करूया, आपली जमीन समृद्ध करूया

जागतिक माती दिन अर्थात जागतिक मृदा दिन दरवर्षी साजरा केला जातो. मातीचे संवर्धन, सुपिकता तिच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, हा या दिवासाचा उद्देश आहे. जगण्यासाठी मूलभूत गरज असलेल्या अन्नाची आवश्यता आहे, ती मातीतून पिकणाऱ्या अन्न धान्यामुळे पूर्ण होते. जमिनीमधील मातीचे परिक्षण करुन योग्य पद्धतीने उत्पादन घेतले तर पिकांचे उत्पादन वाढेल. शेतातील माती निरोगी असेल तर समृद्ध शेती होईल. त्यासाठी मातीचे परिक्षण करुन समृद्धता वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे तुम्ही जर शेतकरी आहात, तुमच्याकडे जमीन आहे तर तुम्ही माती परीक्षण केले पाहिजे. चल, आपली माती आणि तीची गुणवत्ता जाणून घेऊया!.

**मातीचे महत्त्व**

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा मातीशिवाय पूर्ण होऊ शकत नाहीत. माती विना शेती शक्य नाही त्यामुळे निरोगी माती ही समृद्ध शेतीसाठी अत्यंत आवश्क आहे. मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानातून कितीही प्रगती साधली, तरी एकदा नष्ट झालेली माती पुन्हा निर्माण करता येत नाही, हे वास्तव आहे. १० सेंटीमीटर मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्षे लागतात त्यामुळे मातीचे महत्त्व पर्यावरण आणि सजीवांच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे.

**माती संवर्धन काळाची गरज**

आरोग्यदायक माती हा आरोग्यदायी अन्न निर्मितीचा पाया आहे. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापला असून ही जैवविविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे. मातीमध्ये पाणी साठविण्याची आणि ते शुद्ध करण्याची क्षमता आहे, तसेच पूर व दुष्काळासारख्या संकटालाही मातीमुळे मात मिळते. विविध वनस्पतींच्या लागवडीसाठी किंवा अन्न, वस्त्र (कापूस, ताग सारखे विविध धागे) इंधन आणि औषधी वनस्पतींच्या व्यवस्थेसाठी माती मूलाधार आहे. मातीतील विविध घटक कर्बचक्रात महत्त्वाची भूमिका बजावतात. वातावरणातील बदल सहन करणे आणि तो सौम्य करणे यासाठी माती सहाय्यभूत ठरते. जल व्यवस्थापन आणि पूर व दुष्काळ या आपत्तींना तोंड देऊन परिस्थिती पूर्वपदावर आणण्यातही मातीतील विविध घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. अन्न सुरक्षा आणि शाश्वत भवितव्य मातीवरच अवलंबून असल्याने मातीचे संरक्षण, शाश्वत संवर्धन काळाची गरज आहे.

**माती संवर्धन उपाय**

माती संवर्धनासंदर्भातील उपाययोजनांसाठी महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२५ दरम्यान मातीचे नमुने गोळा करण्याबाबत पंधरवडा मोहिम राबवित आहे. यानुसार राज्यातील १० लाख ८० हजार शेतकऱ्यांच्या मातीचे परिक्षण करुन जमीन आरोग्य पत्रिका वितरण करण्याचे निश्चित केले आहे. तसेच जिल्हा, तालुका, गावस्तरावर शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिका वितरीत करुन जमिनीच्या आरोग्य विषयषक, माती परिक्षणाचे महत्त्व, जमीन सुपीकता निर्देशांक व जमीन आरोग्य पत्रिका आधारित खतांच्या संतुलित वापराविषयी, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, सेंद्रीय खत वापराचे फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कृषी विभाग, जिल्हा परिषद, आत्मा यंत्रणा, कृषी विद्यापीठ, संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, नोंदणीकृत खासगी प्रयोग शाळा, कृषी विषयक संस्था इत्यादींच्या सहयोगाने जिल्ह्यांमध्ये ५ डिसेंबर रोजी मृद आरोग्याचे महत्त्व, सॉईल हेल्थ कार्ड, मोबाईल पद्वारे मृद नमुने तपासणी केल्यावर जमीन आरोग्य पत्रिका आधारीत खतांचा संतुलित वापर याबाबत चर्चासत्रे, व्याख्याने कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

**माती परीक्षणाचे फायदे**

माती संवर्धनासाठी माती परीक्षण करुन घेऊन त्यानुसार उपयोजना केल्यास त्या फायदेशीर ठरतात त्यामुळे जमिनीतील उपलब्ध घटकांचे प्रमाण समजते. त्यावर आधारीत पिकांच्या गरजेप्रमाणे आवश्यक तेवढेच खत दिल्यामुळे आर्थिक बचत होते. जमिनीच्या प्रतीनुसार पिकांची निवड व नियोजन करता येते. खतांचा संतुलित वापर केल्यामुळे पिकांची वाढ चांगली होऊन अधिक उत्पादन मिळते. जमिनीची सुपिकता आजमावता येते. जमिनीतीत काही दोष असतील तर ते देखील समजतात आणि दोषानुसार जमीन सुधारण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येतात.

**माती परीक्षण कसे करावे?**

शेतकऱ्यांनी कागदावर लिहून तो कागद माती नमुन्याच्या पिशवीत टाकावा.


१) माती नमुना क्रमांक, २) माती नमुना घेतल्याची तारीख, ३) शेतकऱ्याचे संपूर्ण नाव, ४) मोबाईल क्रमांक, ५) गाव/पोस्ट, ६) तालुका, ७) जिल्हा, ८) सव्हे /गट क्रमांक, ९) नमुन्याचे प्रातिनिधी क्षेत्र, १०) जमीन प्रकार बागायत/जिरायत, ११) मागील हंगामातील पीक/जात, १२) पुढील हंगामातील पीक/जात, १३) मातीची खोली सें.मी., १४) जमीनीचा उतार, १५) जमीनीची काही विशेष लक्षणे-खारवट, चोपण,आम्ल व इतर, १६) पाण्याचा निचरा बरा/वाईट, १७) माती गोळा करणाऱ्याची स्वाक्षरी घेवून मातीचे नमुने संबंधित गावातील कृषी सहायक/कृषी पर्यवेक्षक/ मंडल कृषी अधिकारी यांच्यामार्फत किंवा स्वत: जिल्हा मृद चाचणी प्रयोगशाळेकडे वरीलप्रमाणे माहिती भरुन पाठवावा.

**-रणजित पवार,** उपसंपादक,
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

# सभापती कृष्णा पारंगे कार्यतत्पर लोकप्रतिनिधी

खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा गंगाराम पारंगे एक आदर्श व्यक्तिमत्त्व, लोकप्रतिनिधी, प्रामाणिक, कार्यतत्पर, सर्वसमावेशक आणि जनहित डोळ्यांसमोर ठेवणारे सभापती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. वासांबे (मोहोपाडा) ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून त्यांची लोकप्रतिनिधी म्हणून ओळख निर्माण झाली.

धर्मपत्नी कांचन पारंगे या खालापूर पंचायत समितीच्या सभापती असताना कृष्णा पारंगे यांनी सामाजिक कार्यकर्त्याची भूमिका बजावली. जनतेच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांच्या विकासासाठी व न्यायासाठी लढा देण्याची महत्त्वाची जबाबदारी स्वीकारत असतात, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी उपलब्ध आणि तयार राहणे, नागरिकांचे प्रश्न ऐकून घेणे आणि त्यांच्याशी पारदर्शक संवाद साधणे हा त्यांचा दिनक्रम झाला आहे. निष्कलंक प्रतिमा आणि भ्रष्टाचारापासून दूर राहणे हे तत्त्व त्यांनी अंगीकारले आहे.




खालापूर तालुक्यातील विविध क्षेत्रांच्या विकासाचा आणि भविष्याचा वेध घेणारा सुयोग्य सभापती म्हणून खालापूर तालुक्यातील जनतेचे कृष्णा पारंगे हे आशास्थान बनले आहेत. जनता आणि शासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करताना त्यांनी निःपक्षपाती धोरण आखले आहे. पाणीटंचाई काळात स्वःखर्चाने त्यांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला आहे.

दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वेगवेगळ्या आजारांवर मात करण्यासाठी वैद्यकीय उपचार शिबिर आयोजित करणे, सामान्य जनतेला आवश्यक ती मदत करणे यातून कृष्णा पारंगे यांची सामाजिक बांधिलकी दिसून येते. खालापूर तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज आणि मूलभूत सुविधांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. जात, धर्म वा प्रांताचा भेदभाव न करता सर्वांना समान न्याय देणे आणि जनतेचे हित साधण्यासाठी ते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली भविष्यातही कार्यरत राहणार आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**-अर्जुन कदम**

## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोनचं स्टोरेज फुल झालंय? अशी करा स्पेस

आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे, मात्र सगळ्यांनाच त्रास देते स्टोरेज फुल! फोनची मेमरी भरली की



त्याची गती मंदावते, तो हँग होऊ लागतो आणि मग फोन वापरताना त्रास होतो. फक्त काही लपलेल्या सेटिंग्ज आणि तंत्रज्ञानातील सोप्या ट्रिक्स वापरा आणि पाहता पाहता फोन होईल पुन्हा चपळ, झपाट्याने काम करणारा.

फोनची स्टोरेज रिकामी करणाऱ्या चार कमाल ट्रिक्स (यातील तिसरी ट्रिक तर बहुतेकांना माहीतच नसते!)

१) ॲपचे Cache त्वरित साफ करा - मोठा स्पेसचोर!

आपल्या फोनमधील अनेक ॲप्स वापरल्यावर त्यांच्या उरलहश फाइल्स वाढत जातात. या तात्पुरत्या असल्या तरी काही दिवसांतच त्या शेकडो चइ जागा खाऊन टाकतात.

२) न वापरणाऱ्या ॲप्सना करा 'Goodbye'-डेटा मात्र राहील सुरक्षित!

बऱ्याच मोबाईलमध्ये Offload Apps नावाचे फीचर असते. हे फीचर ॲप हटवते, पण त्यातील डेटा तसाच सुरक्षित ठेवते. त्यामुळे तुम्ही नंतर पुन्हा ते ॲप इन्स्टॉल केले तरी सर्व डेटा तुम्हाला तसाच पुन्हा मिळतो.

वापरात नसलेले गेम्स, जुने सोशल ॲप्स, क्वचित वापरातील टूल्स हटवा, त्यामुळे फोन हलका आणि मोठ्या प्रमाणात जागा मोकळी होते.

अनेक वापरकर्त्यांना ही ट्रिक माहितीच नसते आणि त्यामुळे त्यांच्या फोनची मेमरी अनावश्यकपणे भरून राहते

३) Downloads फोल्डरमध्ये लपलेल्या 'जम्बो फाइल्स' डिलीट करा

आपण जे काही डाऊनलोड करतो त्या PDFs, मोठे व्हिडीओ, मीम्स-ते सर्व Downloadsमध्ये साठत राहतात. महिने- महिने तिथेच पडून राहिलेल्या फाइल्स जागा खाऊन टाकतात.

४) Recycle Bin/Trash रिकामा करा - लपलेला खजिना! अनेकांना वाटतं की, फाइल डिलीट केली म्हणजे ती गेली, पण नाही! ती ३० दिवसांपर्यंत Recycle Binमध्ये जागा अडवून बसते. Gallery-Trash किंवा Photos-Bin पूर्णपणे रिकामी करा. शेकडो MB जागा एका क्षणात मोकळी होईल.

# युवा क्रांतिकारक खुदीराम बोस

खुदीराम बोस भारतातील सर्वात तरूण वयाचा क्रांतीकारक म्हणून ओळखले जातात. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी ते हुतात्मा झाला. त्यांचा जन्म बंगालमधल्या मेदिनीपूर जिल्ह्यातल्या बहुवेनी या गावात ३ डिसेंबर १८८९ला झाला. त्यांच्या लहानपणीच आई (लक्ष्मीप्रियादेवी) आणि वडील (त्रैलोक्यनाथ) यांचा मृत्यू झाल्याने त्यांची मोठी बहीण अनुरूपादेवी आणि तिचे पती अमृतलाल यांनी त्यांचे पालनपोषण केले.

बंगाल प्रांताचे विभाजन करण्याचे ब्रिटीश सरकारने १९०३ साली निश्चित केले. सर्वसामान्य लोकांमध्ये नाराजीची तीव्र लाट पसरली. खुदीरामलाही बंगालच्या फाळणीचा निर्णय अन्यायकारक वाटला, देशासाठी काहीतरी करावे असे सारखे वाटू लागल्याने मिदनापूर येथे थोडेफार शिक्षण झाल्यावर त्याने सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला. सरकारच्या विरूद्ध आंदोलने करणाऱ्यांना पकडून कठोर शिक्षा देण्यात येऊ लागल्या. थोड्याच दिवसांत मुझफफरपूरचे मॅजिस्ट्रेट जे क्रांतिकारकांना अमानुष शिक्षा देत, त्यांना मारण्याची जबाबदारी क्रांतिकारकांचे नेते बरींद्रकुमार व उपेंद्रनाथ यांनी खुदीरामवर सोपवली व मदतनीस म्हणून प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती याला मदतीला



**निमित्त**

दिले. ते दोघेही मुझफ्फरपूरमध्ये आले व मॅजिस्ट्रेट किंग्जफ़ोर्ड याच्यावर लक्ष ठेवून संधीची वाट पाहू लागले. न्यायाधीश किंग्ज फोर्डला मारूनच सरकारचा विरोध करण्याचे त्यांनी पक्के केले. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या आनंदमठ या कादंबरीतील 'वंदे मातरम्' या गीताने त्यांनी लोकांमध्ये नवसंजीवनी पसरविली.

खुदीरामने किंग्ज फोर्डला मारण्याची जबाबदारी स्वीकारली. त्याचा सहकारी प्रफुल्ल चक्रवर्ती याच्या सहकार्याने ३० एप्रील १९०५ या दिवशी किंग्ज फोर्ड याच्या गाडीवर बॉंब फेकून त्याला मारण्याचे निश्चीत झाले. त्याप्रमाणे एक बॉंब फेकण्यात आला, परंतु तो चुकून दुसऱ्याच एका गाडीवर फेकण्यात आल्याने त्या गाडीतील दोन महिला ठार झाल्या. किंग्ज फोर्ड मात्र बचावला. खुदीराम व त्याचा साथीदार यांनी तत्काळ पळ काढला. खुदीराम रातोरात ४० किमी पळाला व बेनी रेल्वे स्टेशनवर आला. भूक लागल्यामुळे तो एका दुकानात चणेफुटाणे घेत असताना तेथील स्टेशनमास्तर पों टरला म्हणत होता, 'अरे ही बातमी वाचली का? काल मुझफ्फपुरला दोन मडमांचा खून करून दोघे जण फरारी झाले आहे. त्यांना पकडण्यासाठी वॉरंट सुटले आहे. तेव्हा आता ही गाडी येईल त्यात कोणी सापडते का पहा.' खुदीरामने हे संभाषण ऐकताच, तो एकदम म्हणाला, 'काय, किंग्जफोर्ड मेला नाही.' जवळच्या लोकांना त्याच्या या उद्गाराचे आश्चर्य वाटले व त्यांना शंका आली. त्याबरोबर खुदीरामने तेथून पळ काढला.

घटनेच्या दुसऱ्या दिवशी खुदीराम पकडला गेला, तर प्रफुल्लने अटकेपूर्वीच आत्महत्या केली. खुदीरामजवळ दोन पिस्तुले व ३० काडतुसे सापडली. त्याच्यावर ३०२ कलमाखाली खटला भरुन त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. ११ ऑगस्ट १९०८ रोजी हा तरुण वीर हातामध्ये गीता घेऊन व भारतमाता की जय म्हणत हसत हसत आनंदाने फाशी गेला. सशस्त्र क्रांतीत बॉंबचा उपयोग करणारा खुदीराम पहिला क्रांतीकारक ठरला. (साभार : बालसंस्कार)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# डोक्याखाली जाड उशी घेऊन झोपणे नुकसानकारक

झोपताना जास्तीत जास्त लोक डोक्याखाली उशी घेतात. काही लोकांना उशीशिवाय झोपच येत नाही, पण असं करणं आरोग्यासाठी किती नुकसानकारक असतं हे अनेकांना माहीत नसतं. या संदर्भात एमबीबीएस, एमडी जनरल मेडिसिन, सल्लागार फिजिशियन डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



कंटेन्ट क्रिएटर डॉ. मेहस यांच्या मते, उशीचा सतत वापर केल्याने त्वचेवर सुरकुत्या पडू शकतात, कारण उशीमुळे चेहऱ्यावर दबाव पडतो. जे लोक उशीचा वापर करत नाहीत, त्यांना ही समस्या होत नाही. उशी न वापरल्याने पिंपल्स येण्याची समस्याही कमी होते, कारण उशीचे कव्हर नेहमी धुतले जात नाहीत. या वेळी डॉ. मेहस यांनी एक व्हिडीओ शेअर करत आपण उशीचा वापर चुकीच्या पद्धतीने कसा करतो हे दाखवलं आहे.

डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी उंच उशीवर झोपल्यास तुमच्या त्वचेवर काय परिणाम होऊ शकतो हे स्पष्ट केले आहे. उंच उशी घेतल्यानं सर्वात पहिला आजार म्हणजे मानेचा त्रास. उशी घेतल्याने मानदुखी सतत चालू राहते. यासाठी तुम्ही नेहमी लहान उशी अथवा अत्यंत मऊ उशीचा वापर करावा तसेच उशीमुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होऊ शकतो. डॉ. रेड्डी पुढे सांगतात, सतत उशीच्या वापरामुळे त्वचेला कोरडेपणा, संक्रमण होण्याची अधिक शक्यता असते.

डॉ. रेड्डी खालील शिफारस करतात की, अशी उशी निवडा जी मानेच्या मणक्यावरील ताण कमी करेल. तरीही जर मानेच्या वेदना कायम राहिल्यास डॉक्टरांकडे जाणे फायदेशीर आहे. डॉक्टर रेड्डी सांगतात, अपुऱ्या पद्धतीच्या उशीचा आधार एखाद्या व्यक्तीच्या मणक्यावर गंभीर परिणाम करू शकतो. ही झीज होऊन मानेच्या डिस्क्स आणि सांध्यांवर परिणाम होतो, ज्यामुळे वेदना होतात. उंच उशीचा वापर केल्याने मणक्याची झीज वाढू शकते, ज्यामुळे स्पॉन्डिलेसिस होण्याचा धोका वाढतो. उंच उशीच्या वापरामुळे सतत मानदुखी, डोकेदुखी आणि खांदेदुखी हा रोजचा त्रास उद्भवू शकतो. यामुळे झोपेमध्ये व्यत्यय, मूडवर परिणाम होऊ शकतो.

डॉ. रेड्डी यांच्या म्हणण्यानुसार उशीचे प्राथमिक कार्य म्हणजे मानेच्या नैसर्गिक वक्रला आधार देणे. डोके आणि मान तटस्थ स्थितीत ठेवणाऱ्या उशा शोधा. मोठ्या उशीचा परिणाम हा मेंदूतील रक्तप्रवाहावरही होतो. त्यामुळे ही सवय तुम्ही त्वरित सोडावी.

# पेणमध्ये शाडू गणेशमूर्तींच्या उत्पादनात वाढ

## पीओपीचा टक्का घटला

**पेण : रामप्रहर वृत्त**

पाच वर्षांच्या तुलनेत यंदा पेणमधील मूर्तिकारांनी शाडूच्या मातीपासून बनणाऱ्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या उत्पादनात तब्बल तीन पटीने वाढ केली आहे. त्यामुळे पेणच्या गणेशमूर्ती उद्योगात सध्या मोठे परिवर्तन पाहायला मिळत आहे.



ग्राहक, गणेशमंडळे आणि परदेशातून वाढलेली मागणी, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पीओपीच्या (प्लास्टर ऑफ पॅरिस) मूर्तींचे वर्चस्व हळूहळू कमी होत आहे. शाडूच्या मूर्तींचा नावलौकिक जागतिक पातळीवर झाला आहे. पेण तालुका आणि शहर मिळून दरवर्षी सुमारे ७५ ते ८० लाख गणेशमूर्तींची निर्मिती केली जाते. या उद्योगात यंदा शाडूच्या मूर्तींची संख्या २५ ते ३० लाखांच्या घरात पोहोचली आहे.

सुशिक्षित आणि पर्यावरणस्नेही नागरिकांकडून, तसेच अनेक गृहनिर्माण संस्थांकडून गेल्या पाच वर्षांपासून शाडूच्याच गणेशमूर्तींना प्राधान्य दिले जात आहे. अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि आखाती देशांमध्ये पीओपी गणेशमूर्तींना पूर्णपणे बंदी असल्याने निर्यात होणाऱ्या पेणच्या मूर्तींमध्ये पर्यावरणस्नेही शाडू मातीच्याच आणि नैसर्गिक रंगांचा वापर केलेल्या गणेशमूर्तींना सर्वाधिक पसंती मिळत आहे. परिणामी, पेणच्या गणेश मूर्तिकारांनी शाडू माती व कागदाचा लगदा यांच्या मिश्रणाच्या गणेशमूर्ती तयार करण्यावर भर दिला.

शाडू माती वाळताना तडे जाण्याची शक्यता असते. मात्र, पेणच्या मूर्तिकारांनी आपल्या पारंपरिक कौशल्यात आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत शाडूच्या मूर्तींमध्येही पीओपीसारखीच अत्यंत बारीक आणि सुबक नक्षीकाम साध्य करण्यात यश मिळवले आहे. परिणामी, पेणमधील गणेशमूर्ती ज्या पवित्र, लोभस आणि शांत चेहऱ्यासाठी प्रसिध्द आहेत, तेच सौंदर्य शाडू मातीच्या गणेशमूर्तीत अबाधित राखण्यात पेणच्या गणेश मूर्तिकारांनी कौशल्यातून यश मिळवले आहे.

बाजारात अजूनही ६५ टक्के वाटा पीओपीच्या मूर्तींचा असला, तरी गेल्या पाच वर्षांतील १० टक्यांवरून थेट ३५ ते ४० टक्यांपर्यंत शाडूच्या गणेशमूर्तींनी मारलेली ही मजल मोठी मानली जात आहे. येत्या काही वर्षांत पेणचा हा संपूर्ण गणेशमूर्ती उद्योग अधिक पर्यावरणपूरकतेकडे वळलेला दिसेल, असा विश्वास खुद्द गणेश मूर्तिकारांनीच व्यक्त केला आहे.

# जिल्ह्यातील तीन अनाथ बालकांना मिळाले हक्काचे कुटुंब

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील दत्तक प्रक्रिया अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार रायगड जिल्हा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत दत्तक प्रक्रियेला गती दिली आहे. दत्तक ग्रहण नियमावली, २०२२ अंतर्गत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा बाल संरक्षण समिती, रायगड किशन जावळे यांच्या परवानगीने जिल्ह्यातील तीन दत्तक प्रकरणांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये दोन संस्थात्मक दत्तक प्रकरणे असून संस्थेतील बालकांना कायदेशीररित्या कायमस्वरूपी कुटुंब उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच एक नात्यांतर्गत (Relative Adoption) दत्तक प्रकरण मंजूर करण्यात आले आहे. या निर्णयामुळे तीन बालकांना सुरक्षित, प्रेमळ व कायमस्वरूपी कुटुंबाचा आधार मिळाला आहे.

ही संपूर्ण प्रक्रिया जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, संबंधित विशेष दत्तक संस्था तसेच केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA) यांच्या समन्वयातून CARINGS या ऑनलाइन प्रणालीद्वारे पारदर्शक आणि नियमानुसार पूर्ण करण्यात आली.

याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, महिला व बालविकास मंत्री यांच्या निर्देशानुसार प्रलंबित दत्तक प्रकरणे तातडीने निकाली काढण्यास प्राधान्य देण्यात येईल. प्रत्येक निराधार बालकाला सुरक्षित, प्रेमळ आणि कायमस्वरूपी कुटुंब मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून दत्तक प्रक्रियेला अधिक गती दिली जाईल.दत्तक प्रक्रिया ही निराधार बालकांच्या पुनर्वसनासाठी अत्यंत महत्त्वाची असून समाजातील पात्र व इच्छुक दाम्पत्यांनी शासनाच्या अधिकृत प्रक्रियेद्वारे दत्तक घेण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# आसानेवाडीत ४०० रोपांची लागवड; १० सोलर दिवे आणि वन तलावाची घोषणा

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

वनसंवर्धनातून शाश्वत विकासाकडे जाण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखणे आणि वनक्षेत्राचा विस्तार करण्याच्या उद्देशाने मौजे आसानेवाडी येथील सामूहिक वनहक्क मान्यता प्राप्त वनक्षेत्रात वनमहोत्सव २०२६-२०२७ अंतर्गत विशेष वृक्षलागवड मोहीम राबवण्यात आली. बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशन, सामूहिक वनव्यवस्थापन समिती आसानेवाडी आणि वातावरण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक प्रजातींच्या ४०० रोपांची लागवड करण्यात आली. तसेच १० सोलर दिवे व वनतलावाची घोषणा करण्यात आली.

यापूर्वी २०२३ ते २०२५ दरम्यान या समितीने ८ हेक्टर वनक्षेत्रावर ३,२२० रोपांचे रोपण केले आहे. कार्यक्रमादरम्यान बोलताना श्रेया सुधीर यांनी जंगलाचे अस्तित्व ही सर्वांसाठी लाईफ लाईन असल्याचे सांगत वनांचे रक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. याच प्रसंगी आसानेवाडी येथे जलसंधारणासाठी वनतलाव खोदणे आणि गावात १० सोलर स्ट्रीट लाइट्स बसवण्यासाठी बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशनतर्फे आर्थिक मदत देण्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.



शहर व ग्रामीण भागातील या सहकार्यावर प्रकाश टाकताना भगवान केसभट यांनी सांगितले की, शहरी भागातील सुशिक्षित व कॉर्पोरेट क्षेत्रातील मंडळींनी ग्रामीण भागातील जंगलांकडे दुर्लक्ष केलेले नाही, हेच या उपक्रमातून सिद्ध होते. त्यांनी सर्वांना वनसंवर्धनात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. स्थानिक पातळीवर या मोहिमेमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. वनतलाव खोदण्याच्या कामामुळे वाडीतील १५ कुटुंबांना ९० दिवसांचा नियमित रोजगार मिळणार असून, यामुळे होणारे स्थलांतर थांबण्यास मदत होईल. तसेच रोपांची उन्हाळ्यात निगा राखणे, पाणी पुरवठा करणे, आळे तयार करणे आणि नैसर्गिक कुंपण उभारण्याची जबाबदारी गावातील १५ महिलांकडे सोपवण्यात आली आहे. यासंदर्भात आसानेवाडी रोहयो ग्रामसभेत रीतसर ठराव मंजूर करण्यात आला आहे.

वनविभागाने या कामांसाठी लिखित परवानगी दिली असून, या प्रकल्पामुळे पुढील ३ वर्षांत गौण वनउपज वाढून रोजगाराचे शाश्वत साधन निर्माण होईल, असा विश्वास सामूहिक वन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किसन मोरे व सदस्य मुक्ता कोळी यांनी व्यक्त केला. गट विकास अधिकारी लता मोहिते आणि वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे यांनीही या त्रिपक्षीय समन्वयाचे कौतुक केले.

या कार्यक्रमास सरपंच उत्कर्षा बेलोसे, गट विकास अधिकारी लता मोहिते, वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे, वातावरण फाउंडेशनचे संस्थापक भगवान केसभट, बजाज इलेक्ट्रिकलच्या सीएसआर हेड श्रेया सुधीर, बजाज इंडेफचे अधिकारी आणि स्थानिक आदिवासी बांधव उपस्थित होते.

# धनगर समाजाकडून विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**खालापूर : प्रतिनिधी**

हर हर चांग भले धनगर समाज संस्था रायगड यांच्या वतीने आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल बनसोडे यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गारमाळ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दामखिंडी, आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खैराट या तीन शाळेतील गोर गरीब गरजू ६० विध्यार्थ्यांना दप्तर वाटप करून एक हात मदतीचा दिला आहे



रायगड जिल्हा धनगर समाजाचे अध्यक्ष अनंता हिरवे यांनी अध्यक्ष पदाची धुरा हातात घेतल्याने त्यांनी समाजासाठी अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबविले आहेत, त्यांनी नुकताच शालेय विद्यार्थ्यांचा खालापूर येथे भव्य गुणगौरव सोहळा आयोजित करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे

त्यातच आता समाजातील गोर गरीब गरजू विध्यार्थ्यांच्या मदतीसाठी ही संस्था पुढे येऊन दुर्गम भागात असलेल्या विध्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले, अतिशय दुर्गम भागात असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गारमाळ चावणी येथील २१ विध्यार्थी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दामखिंडी १७ विध्यार्थी,जिल्हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खैराट येथील २२ विध्यार्थी अश्या एकूण तीन शाळातील ६० विद्यार्थ्यांना आज दप्तर आणि खाऊ वाटप करण्यात आले.

यावेळी रायगड जिल्हा धनगर समाजाचे अध्यक्ष अनंता हिरवे, उपाध्यक्ष तथा सरपंच चावणी बाळासाहेब आखाडे, सचिव संपत ढेबे, खजिनदार रामदास कोकरे, रासपा महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य भगवान ढेबे, खालापूर तालुका अध्यक्ष ठकूराम झोरे, उमेश कोकरे, रघुनाथ आखाडे, लक्ष्मण झोरे, जनार्दन गोरे, बळीराम झोरे, जानू झोरे, विठ्ठल मरगळे लक्ष्मण गोरे, भागूबाई आखाडे गारमाळ शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ डमाले, दामखिंडी शाळेचे शिक्षक निकम खैराट शाळेचे मुख्याध्यापक निलेश जोशी,अंगणवाडी सेविका सुनंदा भोसले, ज्योती झोरे यांच्यासह अनेक शाळेतील विध्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी दिनानिमित्त अलिबागेत भव्य रॅली

**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी बांधवांनी रविवारी (दि.९ ) अलिबाग शहरात भव्य रॅली काढली. पारंपरिक वेशभूषा परिधान करून हजारो आदिवासी बांधव या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. ताशे, आदिवासी वाद्ये आणि विविध घोषणांनी अलिबाग शहर दुमदुमून गेले.

सकाळपासूनच शहरात आदिवासी बांधवांची गर्दी होऊ लागली होती. पारंपरिक पोशाख परिधान करून आणि हातात विविध फलक घेऊन सहभागी झालेल्या नागरिकांनी आपल्या हक्कांसाठी जोरदार घोषणाबाजी केली. रायगड बाजार येथून रॅली निघाली. ठिकारूळ नाका, शिवाजी चौक, बालाजी नका , एस टी स्टँड मार्गे ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आली. तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवानंद करण्यात आले.

आदिवासींचे वनहक्क, जमीन हक्क, शिक्षण, आरोग्य, रोजगार, पाणी, रस्ते तसेच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांसह विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.रॅलीनंतर माळी सभागृह , कुरूळ येथे सभा आयोजित करण्यात आली होती. सभेत आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली


**नमुना एन. डी.**

(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH-46-AV 4276 चे मालक **कुरेश जोहर सेवालियावाला** यांचे तारीख १२/०५/२०२६ रोजी निधन झालेले आहे.

मी जोहर अब्दुल्लाभाई सेवालीयावाला-२०६ साई समर्थ ब्लेसिंग्ज सीएचएस लि,मिरची गल्ली पनवेल, जि. रायगड ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - जोहर अब्दुल्लाभाई सेवालीयावाला**
**पत्ता- २०६ साई समर्थ ब्लेसिंग्ज सीएचएस लि,मिरची गल्ली पनवेल, जि. रायगड ४१०२०६**


# वाडगाव येथे विद्यार्थी गुणगौरव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वाडगाव येथे दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजता सुनिल तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्रात बापदेवी सामाजीक सेवाभावी संस्थेच्या वतीने विदयार्थी गुणगौरव सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी प्रमुख अतिथी अँडव्होकेट प्रसाद पाटील व अँडव्होकेट प्रविणदादा ठाकूर उपस्थित होते तर वाडगाव ग्रा.प.सरपंच सारिका पवार, वाडगाव ग्रा.प.माजी उपसरपंच ऋषीकांत भगत, मुख्याध्यापिका सुंगधा पाटील, आंदोशी शाळा मुख्याध्यापक संतोष भगत, शुभांगी भगत, वाडगाव ग्रा.प.उपसरपंच सरिता भगत, माजी सरपंच सिताराम भगत, संतोष बोले, वाडगाव ग्रा.प.सदस्या निलम थळे, शुभांगी भगत, आदी मान्यवरासह बापदेव सेवाभावी संस्था कमिटी अध्यक्ष रमेश भगत, उपाध्यक्ष प्रदिप आंग्रे, सचिव प्रभाकर भगत, सदस्य शंकर पाटील, गणपत पवार, दिलिप ठाकूर, मधुकर थळे आदीसह विदयाथीवर्ग, सत्कारमुर्ती, तसेच वाडगाव ग्रामस्थ व महिला यांची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. अँडव्होकेट प्रसाद पाटील व अँडव्होकेट प्रविणठाकूर याचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष रमेश भगत व उपाध्यक्ष प्रदिप आंग्रे यांनी शाल,श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून केला.यावेळी दहावी, बारावी गुणवंत विदयार्थी, विशेष प्राविण्य मिळविणारे विदयार्थी, उच्चशिक्षीत विदयार्थी यांच्या सत्कार उपस्थित मान्यवर अँडव्होकेट प्रसाद पाटील, अँडव्होकेट प्रविण ठाकूर व इतर उपस्थित मान्यवर यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थ्रेचे अध्यक्ष रमेश भगत, सुत्रसंचलन नेहा नंदकुमार थळे यांनी केले तर आभार शुभांगी संतोष भगत हिने व्यक्त केले.



# विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

**रोहा : प्रतिनिधी**

विज्ञानाची प्रगती तर्कावर आहे.बुध्दांचे विचार तर्कावर आधारीत आहेत.जगात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान सर्वश्रेष्ठ आहे.निर्भय व्हा जगावर राज्य करा असे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाला महत्व देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना जगभरात काय चालु हे अवगत असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा.धनराज वाघमारे यांनी केले आहे.

बौध्द समाज युवा संघ रायगड जिल्हयाच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी गुणगौरव सोहळा व विद्यार्थ्यांना करिअर गायडन्स कार्यक्रमप्रसंगी जेष्ठ नागरिक सभागृह येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. वाघमारे बोलत होते.यावेळी माजी नगराध्यक्ष समिर शेडगे, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर, बौद्ध समाज युवा संघ अध्यक्ष जितेंद्र गायकवाड, संस्थापक रमेश शिंदे, उपाध्यक्ष सुरेश गायकवाड, रविंद्र आयनोडकर, सागर बोबड, संतोष साळवे, संदेश गायकवाड, सुविनय अहीरे, कोमल गायकवाड, सिद्धार्थ कासारे, जयप्रकाश पवार, ममता भगत, राजेश्री दाभाडे, संदेश कांबळे, अमोल वाटवे, नरेश गायकवाड, राजेंद्र वाघमारे, दिपक दाभाडे, विशाल सुरळकर, वर्षा गायकवाड, सुविधा अहीरे, नारायण गायकवाड, विलास कांबळे आदी उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती मनिषा अनिल म्हात्रे, २) श्री. विकास अनिल म्हात्रे, ३) श्री. विनोद अनिल म्हात्रे, ४) श्री. विलास अनिल म्हात्रे, ५) श्री. सुनिल जनार्दन म्हात्रे नं. १ ते ५ रा. भरत सिंह चाळ, मुळगांव डोंगरी, जुना आश्रम एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व) मुंबई, ६) सुलभा कृष्णा म्हात्रे रा. सुखसागर को. ऑप. डी. सोसायटी रहिवाशी संघ,रूम नं . मी / ६१६, सेंट्रल रोड, एम.आय.डी.सी. आकृती सेंटर, अंधेरी, ७ ) प्रतिभा सुहास जाधव रा. चिखली, ता. जि. सातारा, ८) शितल बाळू गोळे रूम नं. १९५, अचानक नगर, दर्गा रोड, आंबेडकर चौक, मुंब्रा, ठाणे यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत आमच्या अशिलांनी व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| सासवणे ता. अलिबाग, जि.रायगड | ३१४/३ | ०-३५ -०० | २.१० |

सदर वर नमूद केलेली शेती मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे .

अलिबाग
तारीख १०/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**

दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड. मो.नं. ९९२२७१७०३१.
Email: patilshailesh2011@gmail.com



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे बेलवली, ता.पनवेल, जि. रायगड येथील **भिमा नारायण गायकर व इतर ७ यांचे** नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे बेलवली, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| भिमा नारायण गायकर<br>आशिष रामदास घरत<br>राधा कृष्णा पाटील<br>वैशाली संजय भोईर<br>शैलेंद्र कृष्णा पाटील<br>अश्विनी अरूण कुरूंगळे<br>विरेंद्र कृष्णा पाटील<br>गणेश केशव पांचाळ | १२६ | ३ | ०.४०.००<br>पो.ख ०.०३.००<br>**०.४३.००** | ७.७८ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी / नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०८/२०२६

**सही/-**
ॲड. विजय भगत ॲन्ड असोशिएटस्
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)

शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोलीत विविध सामाजिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त, वार्ताहर**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आणि पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नगरसेवक रवींद्र भगत यांच्या आयोजनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.





यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक ८चे उद्घाटन करण्यात आले तसेच श्री कालभैरव मंगल कार्यालय येथे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात कळंबोली गावचे सुपुत्र सुभाष पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच १३व्या विद्यार्थी ऑलिंपिक्स राष्ट्रीय स्पर्धा २०२६मध्ये कुस्ती प्रकारात सुवर्णपदक पटकावून कळंबोली व रायगड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या पै. जीत जयंता पोपेटा यांचाही मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पै. जीत पोपेटा यांच्या उल्लेखनीय यशाचे कौतुक करीत त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेले आरोग्य व सामाजिक उपक्रम समाजोपयोगी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील यांच्यासह स्थानिक नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाशीत घरगुती वादातून मुलाकडून आईची हत्या

**नवी मुंबई : वार्ताहर**




वाशी सेक्टर ११ येथील अष्टविनायक सोसायटीमध्ये रविवारी सायंकाळी एका ६५ वर्षीय महिलेची हत्या झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार ४२ वर्षीय मुलाने आपल्या आईची गळा आवळून हत्या केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी वाशी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार मृत महिलेचे नाव नंदा कदम (६५) असून आरोपीचे नाव महेश कदम आहे. दोघेही वाशी सेक्टर १ येथील अष्टविनायक सोसायटीमध्ये राहत होते. प्राथमिक तपासात आरोपी आपल्या आईच्या वागणुकीवरून नाराज असल्याचे समोर आले आहे. आरोपीचा आरोप होता की, त्याची आई त्याच्या पत्नीला पुरेसे महत्त्व देत नव्हती तसेच मुलीची बाजू घेत होती. याच कारणावरून आरोपीच्या मनात आईविषयी नाराजी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

९ ऑगस्टला सायंकाळी ६ ते रात्री ९.५० वाजण्याच्या दरम्यान घरात वाद झाला. या वादातून संतापलेल्या आरोपीने आईचा गळा आवळल्याचा आरोप आहे. तसेच तिचे डोके फरशीवर आपटल्याचीही माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच वाशी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन अटक केली असून हत्येमागील नेमके कारण आणि संपूर्ण घटनाक्रमाचा तपास सुरू आहे.

# श्रमिक शिक्षण संस्थेची नशामुक्तीसाठी रॅली



**नवी मुंबई : बातमीदार**

वाढत्या व्यसनाधिनतेविरुद्ध जनजागृती करण्यासाठी श्रमिक शिक्षण संस्थेच्या एफ. जी. नाईक महाविद्यालय व रा. फ. नाईक कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १०) शहरात भव्य नशामुक्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० वाजता रा.फ. नाईक महाविद्यालयाच्या प्रांगणातून या प्रभात फेरीला सुरुवात झाली.

रॅलीचे उद्घाटन कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख, वाहतूक पोलीस निरीक्षक योगेश शिंदे, पोलीस मित्र अविनाश वासुदेव आणि श्रमिक शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक संचालिका अमिता पंडित भट, एफ.जी. नाईक वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक व रा.फ. नाईक कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील, माध्यमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका सीमा म्हात्रे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत झाले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली.

रॅलीमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रमिक शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक संचालिका अमिता पंडित भट यांनी सांगितले की, आपण व्यसनापासून दूर राहून सशक्त भारत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्याचबरोबर नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी यांनाही नशामुक्त राहण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सर्वांनी एकत्र येऊन नशामुक्त भारत, सशक्त भारत बनवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. नवी मुंबई पोलीस 'कॅम्पस कनेक्ट' अभियानांतर्गत राबवत असलेल्या उपक्रमांची तसेच नवी मुंबई पोलिसांनी आयोजित केलेल्या पोस्टर व रील मेकिंग स्पर्धेची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. आजची तरुण पिढी अमली पदार्थांच्या आहारी जात आहे ही चिंतेची बाब आहे. निरोगी समाजासाठी प्रत्येकाने व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी रॅलीमध्ये 'व्यसन टाळा, जीवन वाचवा', 'जो करेल नशा त्याची होईल दुर्दशा' अशा जोरदार घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला होता.

# सीवूड्समध्ये महिलांसाठी निःशुल्क योग शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स सेक्टर-४२ ए येथील मातृमिलन चर्चमध्ये 'योग रहस्य'च्या वतीने महिलांच्या आरोग्य, आत्मविश्वास आणि मानसिक जागरूकतेसाठी विशेष निःशुल्क योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. योग मेंटॉर, 'योग रहस्य'च्या संस्थापिका व 'स्वतः आधी, नंतर जग' या पुस्तकाच्या लेखिका काजल नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिराला महिलांसह विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



महिलांच्या दैनंदिन कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये त्यांचे मानसिक व भावनिक संतुलन टिकवून ठेवण्यासाठी 'योग रहस्य' या वेलनेस स्टार्टअपच्या माध्यमातून काजल नाईक विविध उपक्रम राबवत आहेत. 'Discover Your Inner Secret' हे ध्येयवाक्य घेऊन महिलांना शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक शांतता, भावनिक संतुलन, तणावमुक्त जीवन आणि आत्मसन्मानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी या विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला नवी मुंबई महानगरपालिकेचे सभागृह नेते व माजी महापौर सागर नाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच माजी नगरसेवक विनोद म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश म्हात्रे, नगरसेवक विशाल विचारे, नगरसेवक दीपक पवार, माजी महामंत्री अमित मढवी, प्रभाग क्रमांक २६ च्या नगरसेविका व मुख्य आयोजक रेखा म्हात्रे, नगरसेविका संतोषी म्हात्रे आणि समाजसेविका नीलिमा मढवी यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक महिला उपस्थित होत्या. यावेळी काजल नाईक यांनी महिलांना दैनंदिन धावपळीतून स्वतःसाठी वेळ काढण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना माजी महापौर व सभागृहनेते सागर नाईक यांनी काजल नाईक यांनी सुरू केलेल्या 'योग रहस्य' या वेलनेस स्टार्टअपचे कौतुक केले. महिलांच्या जीवनात योगाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक शांतता आणि आत्मविश्वासासाठी योग उपयुक्त आहे. महिलांच्या आरोग्य आणि सक्षमीकरणासाठी 'योग रहस्य'च्या माध्यमातून सुरू असलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे, असे सभागृहनेते सागर नाईक यांनी सांगितले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मोफत रक्त तपासणी

## विद्यार्थिनींच्या आरोग्य संवर्धनासाठी उपक्रम

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील हेल्थ सेंटर, माजी विद्यार्थी संघ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने पी. एस. पॅथॉलॉजिकल लॅब, मोहोपाडा यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच सेवकांसाठी मोफत रक्त तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात सुमारे २०० जणांची रक्त तपासणी करण्यात आली.




कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुधीर घरत उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी जिल्ह्यातील महिलांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण चिंताजनकरीत्या कमी असल्याने भविष्यात विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते याकडे लक्ष वेधले. महाविद्यालयात दरवर्षी विद्यार्थ्यांची विशेषतः विद्यार्थिनींची मोफत रक्त तपासणी करून हिमोग्लोबिन कमी असलेल्या विद्यार्थिनींना शासनामार्फत लोहयुक्त गोळ्यांचे मोफत वितरण तसेच आहार समुपदेशन करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी सुधीर घरत यांनी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी तथा पी. एस. पॅथॉलॉजिकल लॅब, मोहोपाडाच्या संचालिका प्रतिभा पाटील-ठाकूर यांचे विशेष कौतुक केले. गेली १२ वर्षे त्या सातत्याने महाविद्यालयात मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करून सर्व विद्यार्थिनींना संपूर्ण छापील रक्त तपासणी अहवाल उपलब्ध करून देत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमास उद्योजक प्रल्हाद देशमुख, श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, मंगला सत्रे-शेंडे, राजेंद्र ठाकूर, सीमा घरत, सुनील पाटील, राजेंद्र घरत, जयप्रकाश पाटील आणि हरेश बंडा यांची उपस्थिती लाभली.

शिबिराच्या आयोजनासाठी डॉ. एस. आर. पाटील, प्रा. एस. एस. देसाई, प्रा. वाय. ए. गायकवाड, प्रा. योगेश कुलकर्णी, प्रा. प्रियांका ठाकूर आणि प्रा. एस. टी. गोटपगर यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वी करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकतेबरोबरच विद्यार्थिनींमधील रक्तक्षय रोखण्यासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण ठरला.






# वाशीत मध्यरात्री क्रेन रस्त्यावर कोसळली

■ कंटेनरचालकाला किरकोळ दुखापत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी सेक्टर-२६, कोपरी येथील सिडबी ऑफिसर्स क्वार्टर्सच्या बांधकामाच्या ठिकाणी काम सुरू असताना टेलिस्कोपिक मोबाइल क्रेन असंतुलित होऊन रस्त्यावर कोसळल्याची घटना रविवारी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली. क्रेन रस्त्यावरून जाणाऱ्या कंटेनरवर कोसळल्याने कंटेनरच्या चालकाला किरकोळ दुखापत झाली.

या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली. कोपरी येथील पेट्रोल पंपाच्या मागे सिडबी ऑफिसर्स क्वार्टर्सच्या ठिकाणी सबरी कन्स्ट्रक्शनच्या वतीने बांधकाम सुरू आहे. या कामासाठी टेलिस्कोपिक मोबाइल क्रेनचा वापर करण्यात येत होता. रविवारी रात्री काम सुरू असताना क्रेन असंतुलित झाली आणि थेट रस्त्यावर कोसळली. त्याच वेळी रस्त्यावरून कंटेनर वाहन जात होते. क्रेन कंटेनरवर पडल्याने वाहनाचे नुकसान झाले असून चालकाला किरकोळ दुखापत झाली. घटनेनंतर बांधकामाच्या ठिकाणी असलेल्या कामगारांनी मदत करून रस्त्यावर कोसळलेली क्रेन हटवली. त्यामुळे काही काळ वाहतुकीला निर्माण झालेला अडथळा दूर करण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच एपीएमसी पोलिसांनी जखमी कंटेनर चालकाच्या जबाबाआधारे संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती वपोनि. आबासाहेब पाटील यांनी दिली.




# जागतिक आदिवासी दिनानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम

## महाडमध्ये भव्य मिरवणूक, सांस्कृतिक परंपरांचे दर्शन

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात ९ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त तालुक्यातील आदिवासी समाजाच्या विविध संघटनांच्या वतीने भव्य मिरवणुक आणि सांस्कृतिक कार्यक्रमासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




आदिवासी समाजाचे हक्क त्यांची संस्कृती, भाषा आणि त्यांची वेगळी ओळख जतन करणे हा उद्देश समोर ठेवून संयुक्त राष्ट्र संघाने डिसेंबर १९९४ च्या ठरावानुसार ९ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले होते. आदिवासी दिन साजरा करण्याचा प्रमुख उद्देश हा आदिवासी बांधवांच्या जमिनी जल आणि जंगलांच्या अधिकारांचे संरक्षण करणे समाजातील शोषण थांबून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे तसेच त्यांची कला संगीत भाषा आणि संस्कृती टिकवून ठेवणे यासाठी हा दिवस साजरा करण्यात येतो.

रायगड जिल्ह्यासह महाड आणि पोलादपूर तालुक्यातील दुर्गम भागात आदिवासी समाज मोठ्या संख्येने वास्तव्य करीत आहे. डोंगर कपारी आणि दुर्गम भागामध्ये त्यांच्या वाड्यावर या असून आजही अनेक आदिवासी वाड्या विकासापासून वंचित राहिले आहेत. मागील काही वर्षापासून या समाजामध्ये अमुलाग्रह बदल होत असताना दिसून येतो. आपली संस्कृती जतन करण्याबरोबर छोट्या छोट्या व्यवसायातून आपली आर्थिक प्रगती साधत असताना दिसून येतो मासेमारी व्यवसायाबरोबरच रानभाज्या पालेभाज्या काजू इत्यादी पदार्थांची विक्री करून आपली कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.

महाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये जागतिक आदिवासी दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यानंतर संपूर्ण शहरातून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीमध्ये महाड पोलादपूर तालुक्यातील हजारो आदिवासी बांधव आपल्या कुटुंबासह सहभागी झाले होते.

## नव्या पिढीला शिक्षणाशिवाय पर्याय नाही –रणजीत पवार



**पेण : प्रतिनिधी**

सर्व समाज आर्थीक उन्नतीच्या वाटेवर रुढ असताना आदिवासी समाजातील ठाकूर समाज शिक्षणप्रवाहात सर्वांगीण प्रगती करत असतांना आदिम कातकरी समाज हा विटभट्टीवर आपल्या मुलांना रोजदारीसाठी पाठवतो ही दुर्दैवी बाब असून येणा-या प्रगत समाजात मोठमोठ्या प्रस्तावित प्रकल्पामधे नोकरी मिळण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही मुलांना शालेय शिक्षण प्रवाहात जोर जबरदस्तीने पाठवा असे आवाहन आदिवासी सामाजिक कार्यकर्ते रणजित पवार यांनी आदिवासी बांधवाना केले.

जागतीक आदिवासी दिना निमित्ताने पेण महात्मा गांधी मंदिरापासून निघालेली आदिवासी समाज बांधवांच्या रॅलीत आदिम समाजातील परंपरा संस्कृती, पेहराव, तारफा वादन, समाजाची पारंपारीक वार्जत्री, आकर्षक पेहराव.विविध घोषवाक्याचे फलक घेतलेले विद्यार्थी, एक तीर एक कमान सारे, आदिवासी एक समान या घोषणा देत रॅली पेण शहरात फिरत सोबतीने विद्यार्थीनींचे लेझीम पथक बँन्जो, आदिवासी वाद्ये, आकर्षक फेटे पेहरावांनी नटलेल्या या अनोख्या रॅली हॉटेल सौभाग्य इन सभागृहात नेण्यात आली.

या कार्यक्रमास माजी खासदार धैर्यशील पाटील, कृषी पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, माजी सभापती महादेव दिवेकर, आदिम कातकरी संघटना, महाराष्ट्र राज्य संघटना अध्यक्ष विश्वास कानू वाघ, जि.प. सदस्या ताई जोमा दरवडा, जि.प.सदस्य जनार्दन भस्मा, पं.स.सदस्य सुशांत खाकर, सदस्या कमल दत्ता पवार, मंडळ अधिकारी अनंता वाघमारे, सामाजीक कार्यकर्ते महेश बापू पवार, दिलीप वाघ, पेण तालुका ठाकूर समाज संघटना अध्यक्ष जोमा राघो दरवडा, विठ्ठल वाघमारे, सुनिल यशवंत वाघमारे,आदिवासी एकता परिषद अध्यक्ष लक्ष्मण निरगुडा, एकात्मिक आदिवासी वि. प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे मॅडम, सचिव जिल्हा ठाकूर संघटना, रायगड सचिव हरेश धाया वीर, कमळाकर हिराजी काष्टे, राम गणपत लेंडी, शांताराम विष्णू पवार आणि खुमा दोरेयांच्यसह आश्रम शाळांचे विद्यार्थी शिक्षक, आदिवासी ठाकूर कातकरी समाजबांधव महिला व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना रणजित पवार यांनी सांगितले कि, बालविवाह ही अनिष्ट प्रथा समाजात रुढ असून या प्रथेचे समुळ उच्याटन करा, लेकींच आरोग्य जपा, मुलांच्या हातात मोबाईल ऐवजी पुस्तक द्या त्यांना शिक्षणाने समृध्द करा, तरच ठाकूर कातकरी मूळ निवासी समाजाची प्रगतीचा आलेख उंचावेल असे अध्यक्षीय भाषणात सांगितले. यावेळी कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी शासनाच्या समाज कल्याण कृषी व पशुसंवर्धन योजनांचा लाभ मिळवून देणार असे सांगितले तर खासदार धैर्यशील पाटील यांनी उपस्थित समाजबांधवाना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी आदिवासी आश्रमशाळा व समाजातील युवा युवतीचे सांस्कृतिक कार्यक्रम आदिवासी नृत्याचे आयोजन करण्यात आले होते.

## 'परदेश अभ्यास दौऱ्यामध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा'

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कृषी विस्तार कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरिता कृषी विभागाकडून देशाबाहेर अभ्यास दौरा आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी आपले प्रस्ताव दि.२५ ऑगस्ट पूर्वी सादर करावेत असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.विविध देशांनी विकसित केलेले शेती विषयक तंत्रज्ञान त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ याबाबत त्या त्या देशातील शास्त्रज्ञ शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा क्षत्रिय भेटी तसेच संस्थांना भेटी द्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता देशाबाहेर अभ्यास दौरे आयोजित केले जातात.



खोपोली : पोलिसांचा सत्कार करताना आदिवासी बांधव.

## कर्जतमध्ये आदिवासी समाजाची एकजूट; पारंपरिक नृत्याने संस्कृतीचा जागर

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी समाजाने रविवारी एकजुटीचे शक्तिप्रदर्शन करत हा दिवस उत्साहात साजरा केला. आदिवासी तालुका समन्वय समितीच्या माध्यमातून कशेळे येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषा, नृत्य, लेझिम आणि विविध लोककलांच्या सादरीकरणातून आदिवासी संस्कृती आणि परंपरेचा जागर करण्यात आला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विविध राजकीय पक्षांचे नेते एकाच व्यासपीठावर आल्याचे चित्र पाहायला मिळाले. कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्यासह आदिवासी संघटनांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना महेंद्र थोरवे यांनी आदिवासी समाजाच्या एकीचे कौतुक करत तालुक्यातील प्रस्तावित प्रकल्पांबाबत आक्रमक भूमिका मांडली. टाटा असो किंवा टोरेंट, आदिवासी बांधवांचा एकमताने निर्णय होत नाही तोपर्यंत तालुक्यात कोणताही प्रकल्प होऊ दिला जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली. आदिवासी समाजाची एकजूट हीच त्यांची खरी



ताकद असून ही ताकद विकासाच्या निर्णयांमध्येही दिसली पाहिजे, असे थोरवे म्हणाले.सुधाकर घारे यांनीही आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देत राजकारण बाजूला ठेवून समाजाच्या संस्कृती आणि परंपरा जपण्यासाठी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. .

जागतिक आदिवासी दिनानिमित्त सकाळपासूनच तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नेरळमधील कोतवालवाडी येथून हुतात्म्यांना अभिवादन करून मोटरसायकल आणि वाहन रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीमध्ये १०० हून अधिक मोटरसायकली आणि ५० हून अधिक मोठी वाहने सहभागी झाली होती. रॅलीदरम्यान नेरळ शहरातील मुख्य चौकात आदिवासी बांधवांनी पारंपरिक नृत्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला, पुरुष आणि युवकांनी आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवले.भिवपुरी, डिकसळ, कर्जत मार्गे कशेळे येथे रॅलीची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या आयोजनात आदिवासी समन्वय समिती अध्यक्ष कांता पादीर, खजिनदार नितिन निरगुडा, भरत पादीर, अमर लांघी, मनोहर कारोटे तर स्थानिक राजकीय नेते नारायण डामसे, प्रसाद थोरवे, अमर मिसाळ, मालू निरगुडा, परशुराम दरवडा, दत्तात्रय हिंदोला यांच्यासह आदिवासी समाजातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

## नांदगाव बुद्रुकमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप



**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील नांदगाव बुद्रुक गावात बौद्ध विकास मंडळ मुंबई, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बांद्रा तालुका अध्यक्ष – झोपडपट्टी महासंघ, तसेच प्रबुद्ध भूमी फाउंडेशनचे अध्यक्ष प्रमोद चायाजी जाधव यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील मुलांनी शैक्षणिक प्रगती साधून आपला आणि गावाचा विकास साधावा असे आवाहन यावेळी प्रमोद जाधव यांनी केले.

येथील महाबोधी बुद्ध विहार नांदगाव बुद्रुक येथे रविवार ( दि.९) रोजी मोफत शालेय शिक्षण साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित केला होता.ी महाबोधी बुद्ध विहारास ही १२ खुर्च्या दान दिल्या. यावेळी वर्षा वासाचा संयुक्त कार्यक्रम देखील संपन्न झाला . या कार्यक्रमाला पत्रकार निलेशजी पवार, नांदगाव बु. शाळेचे मुख्याध्यापक अजित गावंड, सहाय्यक शिक्षक सतीश पोकळे, अर्चना सुर्वे, अजित जाधव, प्रशांत जाधव, दगडू जाधव, रणजीत जाधव, सिद्धार्थ तांबे, रमेश सकपाळ, रवींद्र जाधव, दामिनी रेशीम, मयुरी रेशीम हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक अजित गावंड, सतीश पोकळे यांनी ज्या संघर्षातून अनेक महापुरुषांनी शिक्षण घेतले आणि जगाला वेगळी दिशा दिली त्यांच्या आदर्शांवर आपण चालले पाहिजे आणि आपल्या आई वडिलांचे नाव उंचावले पाहिजे असे मत व्यक्त केले.तथागतांनी विज्ञानाला महत्त्व देत आदर्श धम्म दिलेला आहे त्यांच्या विचारांना अनुसरून आपण जीवन जगलं पाहिजे असेही मत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरता स्थानिक भावकी, भीम निष्ठा तरुण मंडळ, रमाई महिला मंडळ, संघमित्रा तरुणी मंडळ तसेच नांदगाव बु । या पाचही गावातील सर्व विद्यार्थी व पालक, सर्व उपासक उपासिका उपस्थित होते.

## 'हरे कृष्ण प्रकल्प भावी पिढ्यांसाठी योगदान ठरेल'

**चौक : प्रतिनिधी**

हरे कृष्ण प्रकल्प व्यापक समाजसेवेच्या उद्देशाने राबविला जात असून तो भावी पिढ्यांसाठी एक मौल्यवान योगदान ठरेल. हे मंदिर हे एक आध्यात्मिक केंद्र म्हणून कार्य करेल, तर कम्युनिटी सेंटर लोकांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक गरजा पूर्ण करेल. असे आश्वासन हरे कृष्ण मूव्हमेंट मुंबई अध्यक्ष अमितासन दास स्वामी यांनी दिले.

हरे कृष्ण मुव्हमेंट मुंबईतर्फे हरे कृष्ण मंदिराचा आणि कम्युनिटी सेंटरच्या भूमी मंगलोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योगपती यांच्यासह सभापती कृष्णा पारंगे, पनवेल महापालिका माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, नगरसेविका ममता म्हात्रे, पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.विशाल नेहुल, जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, भाजप मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, काशिनाथ जांभळे,दत्ता कोळी,यांच्यासह हरे कृष्ण मूव्हमेंट चे अनेक सदस्य उपस्थित होते.हरे कृष्ण मुव्हमेंट मुंबईच्या वतीने खालापूर तालुक्यातील वावंढळ येथे हे नियोजित मंदिर आणि कम्युनिटी सेंटर होत आहे. एका महत्त्वपूर्ण आध्यात्मिक आणि सामाजिक विकास प्रकल्पाची ही एक शुभ सुरुवात ठरली आहे.

याप्रसंगी, हरे कृष्ण मुव्हमेंट मुंबईचे अध्यक्ष श्री अमितासन दास स्वामीजी यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि आगामी प्रकल्पाची संकल्पना मांडली. त्यांनी सांगितले की, या विकासकामात तीन मुख्य घटकांचा समावेश असून एक भव्य 'श्री श्री राधा-कृष्ण मंदिर', अत्याधुनिक 'कम्युनिटी सेंटर' (सामुदायिक केंद्र) आणि 'बेसिल वुड्स इंटरनॅशनल स्कूल'होणार आहे.



**खोपोली : शहरात आदिवासी समाजातर्फे जागतिक आदिवासी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. यानिमित्ताने शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष कुलदीप शेंडे यांनी रॅलीचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी आदिवासी समाजाला शुभेच्छा दिल्या.**



**चौक : पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांनी खालापूर येथील श्री स्वामी समर्थ महाराज मठात स्वामींचे दर्शन घेतले. यावेळी माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, सभापती ममता म्हात्रे, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे उपस्थित होते.**

# टीम इंडियाचा विजयी सराव

## श्रीलंकेवर मात; सिराजचे सलग तीन षटकार

**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंका दौऱ्यावर गेलेल्या भारतीय क्रिकेट संघाने या दौऱ्याची सुरुवात विजयाने केली आहे. भारत आणि श्रीलंका एकादश यांच्यात झालेल्या तीन दिवसांच्या सराव सामन्यात भारतीय संघाने सहा गडी राखून सनसनाटी विजय मिळवला. अखेरच्या षटकात भारतीय संघाला विजयासाठी १६ धावांची गरज असताना मोहम्मद सिराजने सलग तीन षटकार ठोकत संघाला टी-२० स्टाईलमध्ये विजय मिळवून दिला.



या तीन दिवसीय सामन्याच्या पहिल्या दिवशी श्रीलंका क्रिकेट एकादशच्या संघाने ८ बाद ३६३ धावा कुटून काढत वर्चस्व गाजवले होते. त्याला प्रत्युत्तर देताना देवदत्त पडिक्कलच्या शतकाच्या जोरावर भारतीय संघाने दुसऱ्या दिवशी सहा बाद ३५७ धावा कुटून आपला डाव घोषित केला होता. अशा प्रकारे श्रीलंका क्रिकेट एकादश संघाला पहिल्या डावात सहा धावांची आघाडी मिळाली होती.

या सामन्यातील खरा थरार रंगला तो अखेरच्या दिवशी. श्रीलंका क्रिकेट एकादश संघाने दुसऱ्या डावात आक्रमक फलंदाजी केली. निशान फर्नांडो (६३), अंजना बंदारा (३५) आणि निपुण धनंजया (४६) यांनी केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर श्रीलंका क्रिकेट एकादश संघाने ४५ षटकात २०० धावा फटकावून भारतासमोर विजयासाठी २०७ धावांचे आव्हान ठेवले.

या आव्हानाचा पाठलाग करताना यशस्वी जयस्वालने आक्रमक फलंदाजी करत कर्णधार शुबमन गिलसोबत मिळून संघाला अवघ्या १५ षटकांतच शतकी सलामी दिली. ४६ चेंडूत ६३ धावा कुटल्यानंतर यशस्वी जयस्वाल निवृत्त झाला. त्यानंतर शुबमन गिलही ४४ धावा काढून बाद झाला. गिल बाद झाल्यानंतर भारताचा डाव अडखळला. ऋषभ पंत (२८), ध्रुव जुरेल (१७) हे ठरावीक अंतराने बाद झाले, तर रवींद्र जडेजा (२२) आणि मानव सुतार (४) हे निवृत्त होऊन तंबूत परतले.

शेवटच्या २५ चेंडूत भारताला विजयासाठी २९ धावांची गरज होती, तर अखेरच्या षटकात भारती संघाला विजयासाठी १६ धावांची आवश्यकता होती. त्यावेळी मोहम्मद सिराजने पहिल्या सलग तीन चेंडूवर तीन षटकार ठोकत भारताला विजय मिळवून दिला. हा सराव सामना असल्याने उर्वरित तीन चेंडूंचाही खेळ पूर्ण करण्यात आला. त्या तीन चेंडूत सिराजने एका चौकारासह मिळून पाच धावा काढल्या. अखेरीस सिराज १५ चेंडूत ३२ धावा काढून नाबाद राहिला.

# ...म्हणून प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारली नाही -लक्ष्मण

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

माजी भारतीय फलंदाज व्हीव्हीएस लक्ष्मण यांचे नाव भारतीय पुरुष क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी अनेकदा चर्चेत राहिले आहे. यावर बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी खुलासा केला आहे.

लक्ष्मण म्हणाले, २०२३मध्ये ते भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक होणार होते. त्या वेळी एकदिवसीय विश्वचषकानंतर राहुल द्रविड यांचा पहिला कार्यकाळ संपणार होता, मात्र वैयक्तिक कारणांमुळे त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली नाही. मी जय शाह यांना दोन वेळा भेटून माझी कारणे सांगितली आणि त्यांनी ती समजून घेतली. त्यानंतर द्रविड यांचा कार्यकाळ २०२४ टी-२० विश्वचषकापर्यंत वाढवण्यात आला.

मे २०२४मध्ये बीसीसीआयने द्रविड यांच्या उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू केला तेव्हाही लक्ष्मण यांच्याशी संपर्क साधण्यात आल्याची चर्चा होती. त्या पदासाठी ते आघाडीच्या उमेदवारांपैकी एक मानले जात होते, परंतु अखेरीस गौतम गंभीर यांची निवड झाली. दरम्यान, लक्ष्मण यांनी राष्ट्रीय



संघाशी आपला संबंध कायम ठेवला आहे. त्यांनी अनेक वेळा हंगामी मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिले असून अलीकडेच झिम्बाब्वे दौऱ्यातील भारताच्या टी-२० मालिकेदरम्यानही त्यांनी ही जबाबदारी सांभाळली होती.

**दोन वर्षे 'सीओई'मध्ये काम करणार**

लक्ष्मण यांनी सांगितले की, सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई)मध्ये आपला कार्यकाळ वाढवण्याचा निर्णय घेताना माजी बीसीसीआय सचिव जय शाह यांनी दिलेल्या स्वातंत्र्याचा आणि विद्यमान सचिव देवजित सैकिया यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे मी सीओईमधील माझा कार्यकाळ दोन वर्षांनी वाढवला आणि बीसीसीआयला स्पष्ट सांगितले की, मुख्य प्रशिक्षकपद स्वीकारणार नाही.

# वनडे कपमध्ये युवा फलंदाजाची तुफानी खेळी

## ३७ चेंडूंत कुटल्या ८६ धावा



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या वनडे कप स्पर्धेत हॅम्पशायरचा फलंदाज टोबी अल्बर्ट याने तुफानी फलंदाजी करत मैदानात जोरदार फटकेबाजी केली. टोबीने ससेक्सविरुद्ध खेळताना अवघ्या ३७ चेंडूत ८७ धावा कुटल्या. त्याच्या धुवांधार खेळीच्या जोरावर हॅम्पशायरने ससेक्स संघाचा ५१ धावांनी पराभव केला.

टोबी अल्बर्टने २१ धावांवर असताना जीवदान मिळालेल्या या संधीचा पूर्ण फायदा घेतला. त्याने पाच चौकार आणि आठ षटकारांचा नजराणा पेश केला. यामध्ये सलग सहा चेंडूंवर सहा षटकार ठोकण्याचा पराक्रमही त्याने केला.

दरम्यान, अल्बर्टचा हा सगा षटकारांचा पराक्रम एकाच षटकात नसून दोन वेगवेगळ्या षटकांत पाहायला मिळाला. त्याने प्रथम नँटेस ओस्टहुइझेनच्या षटकातील शेवटच्या दोन चेंडूंवर सलग दोन षटकार ठोकले. त्यानंतर पुढच्या षटकात स्ट्राईक मिळताच ओली कर्टलेच्या पुढील चारही चेंडूंवर षटकार मारत सलग सहा चेंडूंवर सहा षटकार पूर्ण केले.

टोबीच्या आधी हॅम्पशायरला सलामीवीर अली ओर (१०५) आणि १८ वर्षीय बेन मेस (१०९) यांनी शतकी खेळी करून भक्कम पाया रचून दिला. या फलंदाजांच्या जोरावर हॅम्पशायरने ५० षटकांत ९ बाद ३८३ धावांचा डोंगर उभारला. धावांचा पाठलाग करताना ससेक्सकडून चार्ली टीयरने ९४ चेंडूंत १११ धावांची झुंजार शतकी खेळी केली. मध्यक्रमात जॅक लीनिंगने ९२ आणि दान इब्राहिमने ५५ धावा केल्या, मात्र संघ ३३२ धावांवर गारद झाला.

# रोहितला २०२७ वर्ल्डकपपर्यंत निर्धास्तपणे खेळू द्या!

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या साधारण वर्षभरापासून रोहित शर्मा २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक खेळणार की नाही याबद्दल भारतीय क्रिकेटमध्ये बरीच चर्चा आणि तर्कवितर्क सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर अजिंक्य रहाणेने भूमिका मांडली आहे.

रहाणेने नुकतीच निवृत्ती जाहीर केली आहे. एका मुलाखतीत तो म्हणाला, रोहित शर्माला स्पष्ट सांगितले पाहिजे की, तो २०२७चा वनडे वर्ल्डकप खेळणार आहे. अनेक वर्षांतील त्याचे योगदान पाहा, जे कमालीचे आहे. विश्वचषकासारख्या स्पर्धेत अशा अनुभवी खेळाडूची गरज असते. एकेक मालिकांच्या आधारे तुम्ही निर्णय घेऊ शकत नाही, कारण तो एक मोठा खेळाडू आहे.

रहाणे पुढे म्हणाला, आपण

**रहाणेचे स्पष्ट मत**

त्यांना मोकळेपणाने खेळू द्यायला हवे. प्रत्येक खेळाडू कारकिर्दीत त्या टप्प्यावर पोहचतो, पण वरिष्ठ खेळाडूंनाही कर्णधार आणि टीम मॅनेजमेंटचा पाठिंबा मिळाला की ते अधिक आत्मविश्वासाने खेळतात. त्यांना २०२७ वर्ल्डकपपर्यंत निर्धास्तपणे खेळू द्या.

अजिंक्यने क्रिकेटमधील 'रिदम'चे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, क्रिकेट हा रिदमचा खेळ आहे. तुम्ही युवा खेळाडू असो किंवा अनुभवी, लय मिळणे महत्त्वाचे असते. रोहितच्या गुणवत्तेबद्दल बोलण्याची गरजच नाही. यावर कोणताही वाद होऊ नये. जर त्याला २०२७ वर्ल्डकप खेळायचा असेल, तर त्याने नक्की खेळला पाहिजे.




सौजन्य : सौ. अनिता वासुदेव पाटील (नगरसेविका)


# बॉक्सिंगपटू लोव्हलिनाचे पंतप्रधान मोदींकडून कौतुक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नुकत्याच स्कॉटलंडमधल्या ग्लासगो शहरात झालेल्या कॉमनवेल्थ स्पर्धेदरम्यान निर्भीडपणा दाखवणाऱ्या बॉक्सिंगपटू लोव्हलिना बोरगाईन हिचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले आहे. पंतप्रधानांनी या स्पर्धेत पदकविजेत्या खेळाडूंची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी लोव्हलिनाला शाब्बासकी दिली.

लोव्हलिनाने ७५ किलो वजनी गटात रौप्यपदकावर नाव कोरले. बॉक्सिंगपटूंनी ग्लासगो येथे झालेल्या स्पर्धेत १० पदकांची कमाई केली. या घवघवीत यशानंतर बॉक्सिंगपटू विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जमले होते. त्यावेळी तिथे भारताचा नकाशा होता. त्या नकाशात ईशान्य भारत वगळण्यात आला होता.

पंतप्रधान मोदींनी लोव्हलिनाला, 'त्या रेस्टारंटमध्ये नक्की काय झाले? आपला नकाशा चुकीचा आहे हे तू निर्भीडपणे सांगितलेस' याबाबत काय सांगशील, असे विचारले. लोव्हलिनाने हसून प्रतिसाद दिला. ती म्हणाली, आम्ही विजयाचा आनंद साजरा करत होतो. त्यावेळी आम्हाला हा नकाशा दिसला. तो पाहून मला अतिशय वाईट वाटले. मी नम्रपणे त्या रेस्टॉरंटच्या मालकांना सांगितले की, मी ईशान्य भारतात राहते. जेव्हाही तुम्ही भारताचा नकाशा दाखवता तो योग्यच असायला हवा. नसेल तर तो नकाशा लावू नका. त्यांनी आमचे म्हणणे ऐकून तातडीने बदल करू, असे आश्वासन दिले'.






# 'बेबी एबी'चा नो-लूक षटकार

**लंडन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा आक्रमक फलंदाज डेवाल्ड ब्रेविस, ज्याला 'बेबी एबी' म्हणूनही ओळखले जाते. सध्या तो इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या द हंड्रेड स्पर्धेत धुमाकूळ घालत आहे. लंडन स्पिरिट संघाकडून खेळताना ब्रेविसने जवळपास प्रत्येक सामन्यात धावांचा पाऊस पाडला आहे. यादरम्यान, त्याने मारलेला एक नो-लूक षटकार सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

लंडन स्पिरिट आणि बर्मिंगहॅम फिनिक्स यांच्यातील सामन्यात ब्रेविसने एकापेक्षा एक कमालीचे फटके खेळले, पण त्याच्या नो लूक षटकाराने मैदान गाजवले. फिरकीपटू रेहान अहमदच्या एका चेंडूवर त्याने लॉन्ग-ऑनच्या दिशेने एक जबरदस्त नो-लूक षटकार खेचला. विशेष म्हणजे, ब्रेविसचा हा षटकार ९७ मीटर अंतराचा होता.

लियाम लिव्हिंगस्टोन आणि डेवाल्ड ब्रेविस यांच्या अर्धशतकांच्या बळावर लंडन स्पिरिटने बर्मिंगहॅम फिनिक्सचा १८ चेंडू बाकी असताना पराभव केला. लिव्हिंगस्टोनने ३० चेंडूंमध्ये ६६ धावांची धडाकेबाज खेळी साकारली, तर ब्रेविसने ३१ चेंडूंमध्ये ५५ धावा करत त्याला उत्तम साथ दिली.




सौजन्य : श्री. अमित जाधव (जिल्हाध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा)







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com